रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ४
www.ramprahar.com

सोमवार २१ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

अनेक भागात मुसळधार पावसाचा इशारा/२

शालेय विद्यार्थ्यांनी गिरवले लोकशाहीचे धडे/५

रायगड जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा उत्साहात/८

## व्हिएतनामच्या समुद्रात बोट उलटून ३८ जणांचा मृत्यू



**कांग निन्ह :** व्हिएतनामच्या दिशेने घोंघावत येणाऱ्या विफा चक्रीवादळात एक प्रवासी बोट अडकली आणि उलटली. यात सुमारे ३८ जणांचा मृत्यू झालाय. हा लाँग बे या व्हिएतनामच्या काँग निन्ह प्रांतातल्या किनारी प्रदेशाजवळ ही दुर्घटना घडली. १८ जुलैपासून हे चक्रीवादळ दक्षिण चीन समुद्रात सक्रिय झाले असून २२ जुलैदरम्यान हे वादळ जमिनीवर धडकणार आहे, मात्र त्याआधीच या वादळाने दक्षिण आशियाई देशांमध्ये विध्वंस घडवण्यास सुरुवात केली आहे. व्हिएतनाम, थायलंड आणि फिलीपाईन्स हे देश सध्या विफा चक्रीवादळाच्या तडाख्यात सापडले आहेत. अशातच उत्तर व्हिएतनाममधील कांग निन्ह प्रांतातील हा लाँग बे या किनारी प्रदेशाजवळ बोटीचा अपघात झाला. या बोटीवर ५३ जण होते. त्यातील ४८ जण पर्यटक, तर पाच क्रू मेंबर्स होते. स्थानिकांनी बचावकार्य सुरू करून काही जणांना वाचवले.

# हिंदू सणांना लक्ष्य करणाऱ्यांना प्रत्युत्तर देणार

## मंत्री आशिष शेलार यांचे प्रतिपादन; पेणमध्ये मूर्तिकारांकडून सत्कार

**पेण : प्रतिनिधी**

पर्यावरणाचे कारण पुढे करून हिंदूंच्या सण-उत्सवांना लक्ष्य करण्याचे काम काही शहरी नक्षलवादी करीत आहेत. त्यांना प्रत्युत्तर देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील महायुती सरकार वेळोवेळी करेल, असे अभिवचन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा भाजपचे रायगड जिल्हा संपर्कमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी रविवारी (दि. २०) येथे दिले.

पीओपी गणेशमूर्ती बनविणे व विक्री करणे यावरील बंदी मुंबई उच्च न्यायालयाने नुकतीच उठवल्याने मूर्तिकारांना मोठा दिलासा मिळाला आहे. यामध्ये मोलाची भूमिका निभावणारे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन हमरापूर विभाग गणेश मूर्तीकार उत्कर्ष मंडळाच्या वतीने पेण तालुक्यातील तांबडशेत येथे करण्यात आले होते. त्या वेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



या कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, माजी जि.प. अध्यक्ष नीलिमा पाटील, माजी सभापती सदस्य चित्रा पाटील, पेणच्या माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, महाराष्ट्र राज्य गणेश मूर्तीकार संघटनचे अध्यक्ष अभय म्हात्रे, हमरापूर संघटना अध्यक्ष जयेश पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी आणि गणेशमूर्तिकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पीओपी बंदीद्वारे गणेश मूर्तिकारांवर गदा आणण्याचे काम हे आघाडी सरकारचे पाप आहे. पीओपीच्या मूर्तींवरील बंदीबाबत ठरवून षडयंत्र केले गेले, परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आम्ही मूर्तीकार बांधवांच्या सोबतीने एकजुटीने लढलो आणि जिंकलो. हा विजय आपल्या पारंपरिक सणांच्या जपणुकीसाठी खूप महत्त्वाचा आहे, असे सांगून गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्य महोत्सव करण्याचे काम महायुती सरकारने केल्याचे मंत्री आशिष शेलार यांनी नमूद केले.

या वेळी बोलताना खासदार धैर्यशील पाटील यांनी, या भागात मोठ्या प्रमाणात तरुणांना गणपती कारखान्याच्या माध्यमातून रोजगार निर्माण झालेला आहे. पर्यावरणवाद्यांना फक्त पीओपीचे प्रदूषण दिसते का? येथील कारखान्यांचे प्रदूषण दिसत नाही का? असा सवाल केला.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, श्रद्धाळू, भाविकांच्या भावना जपण्याचे काम केंद्रात पंतप्रधान नरेंद मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांचे सरकार करीत आहे. देशभरातील तीर्थस्थळी जाण्यासाठी असणाऱ्या रस्त्यांचा कायापालट करण्याचे काम झाले असून या माध्यमातून ठिकठिकाणी भाविकांना जाणे सुकर झाले आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून आपली अस्मिता जपण्याचे काम होत आहे. मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे काम होत आहे. रायगड किल्ल्याच्या संवर्धनाकरिता ६०० कोटी रुपये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केले. देशात पाच ठिकाणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्मारके उभारण्याचे काम होत आहे. अशा प्रकारे आपली श्रद्धास्थाने, तीर्थस्थाने जपण्याचे काम सरकार करीत आहे.

आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, या भागात पूर्वी शेती, शेतीपूरक व्यवसाय व दुग्ध व्यवसाय हा प्रामुख्याने होत असताना येथील नागरिकांनी गणेशमूर्ती व्यवसाय अवलंबला. यातून चांगली रोजगार निर्मिती होत गेली. आता गणेशमूर्ती बनविणे व विक्री करणे हा येथील प्रमुख व्यवसाय बनला असून यातून हजारो तरुणांना रोजगार निर्माण करण्याचे काम झाले आहे. मध्यंतरीच्या काळात पीओपीच्या बंदीमुळे येथे रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता, परंतु राज्य सरकारच्या माध्यमातून सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांनी न्यायालयीन लढा जिंकून गणपती कारखानदारांवरचे संकट दूर करण्यात यश मिळविले आहे.

गणेश मूर्तिकारांना दिलासा मिळवून देण्यात मोलाचे वाटा उचलणारे सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार हे खऱ्या अर्थाने संस्कृती व धर्मरक्षक ठरले असल्याचे भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी म्हटले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मूर्तिकार कुणाल पाटील यांनी मानले.

# आजपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन

## ऑपरेशन सिंदूर, न्या. वर्मा महाभियोग, पहलगाम हल्ल्यावर चर्चेस सरकार तयार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवार (दि. २१)पासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केले की, केंद्र सरकार ऑपरेशन सिंदूर, पहलगाम दहशतवादी हल्ला आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे युद्धबंदीचे दावे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर संसदेच्या पावसाळी अधिवेशनात चर्चेसाठी पूर्णतः तयार आहे.

संसदीय अधिवेशनच्या पार्श्वभूमीवर रविवारी सर्वपक्षीय बैठक झाली. या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री रिजिजू माध्यमांशी संवाद साधला. अधिवेशनात कोणत्याही विषयावरून सरकार मागे हटणार नाही. सर्व प्रश्न संसदेच्या पटलावर घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

सभागृह नेते आणि केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसभेत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत ५१ राजकीय पक्षांच्या ५४ खासदारांनी सहभाग घेतला. सरकारच्या वतीने किरेन रिजिजू आणि राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी बैठकीला हजेरी लावली. विरोधी पक्षाच्या वतीने काँग्रेसचे गौरव गोगोई आणि जयराम रमेश, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, द्रमुकचे टीआर बाळू, आरपीआयचे रामदास आठवले हेही बैठकीला उपस्थित होते.

मंत्री रिजिजू म्हणाले, विरोधक, सत्ताधारी व अपक्ष सर्वांनी आपले मुद्दे मांडले. आपले विचार भिन्न असू शकतात, पण संसद सुरळीत चालवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. सध्या १७ विधेयके तयार असून ती या अधिवेशनात मांडण्यात येतील. या अधिवेशनात विविध क्षेत्रांतील महत्त्वाचे विषय चर्चेत येणार आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.

ना. रिजिजू पुढे म्हणाले की, संसदेच्या सुरळीत कामकाजासाठी सरकार व विरोधक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. आम्ही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चेला तयार आहोत. संसदीय नियम व परंपरांचा आम्ही आदर करतो. लहान पक्षांना बोलण्याची वेळ कमी मिळते, यावर त्यांनी सहमती दर्शवली व सांगितले की, लोकसभा अध्यक्ष व राज्यसभा सभापतींसोबत चर्चा करून या विषयी योग्य निर्णय घेतला जाईल.

## निवडक

### रशियात पाच शक्तिशाली भूकंप; त्सुनामीचा इशारा

**मॉस्को :** रशियाच्या फार ईस्टमधील कामचात्का प्रदेशात अवघ्या एका तासात पाच तीव्र भूकंप झाले असून त्यामध्ये सर्वाधिक तीव्रता ७.४ इतकी नोंदवण्यात आली आहे. या भूकंपामुळे प्रशांत महासागरात सुनामीची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या कोणतीही जीवितहानी किंवा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे वृत्त नाही. स्थानिक प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

### चित्रपट दिग्दर्शक, निर्माते चंद्रा बारोट यांचे निधन

**मुंबई :** ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक आणि १९७८ साली प्रदर्शित झालेल्या 'डॉन' या कल्ट क्लासिक चित्रपटाचे निर्माते चंद्रा बारोट यांचे रविवारी (दि. २०) सकाळी मुंबईतील वांद्रे येथील रुग्णालयात निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. 'डॉन' या एकाच चित्रपटाने चंद्रा बारोट यांना भारतीय चित्रपटसृष्टीत अजरामर केले. त्यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

# पावसाळी पर्यटनासाठी रायगडावर आलेल्या पर्यटकांची बस उलटली

**महाड : प्रतिनिधी**

पावसाळी पर्यटनासाठी किल्ले रायगड परिसरात आलेली एका खासगी बस रविवारी (दि. २०) माणगाव-किल्ले रायगड मार्गावर घरोशी गावाच्या हद्दीत उलटली. या अपघातात ११ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

**११ जण किरकोळ जखमी**

सध्या शनिवार आणि रविवार या दोन दिवशी रायगडावर पावसाळी पर्यटनासाठी गर्दी होत आहे. अशाच प्रकारे या रविवारीदेखील गडावर गर्दी होती. पुणे येथून आलेल्या पर्यटकांची खासगी बस घरोशी गावाच्या हद्दीत उलटली. या अपघातात ११ प्रवासी किरकोळ जखमी झाले. हा अपघात गाडी रस्त्यावरून घसरल्याने झाल्याचे एका प्रवाशाने सांगितले.

अपघातातील जखमींमध्ये अनिकेत आघाळ, किरण धाविल, आशिष आभोरे, तुकाराम चोपडे, भीमा कांबळे, तुळशीराम जाधव, शिवाजी जाधव, जान्हवी पारकर, माधुरी ठोबळ, दिव्या अहिरे, तेजस पाटील यांचा समावेश आहे. त्यांच्यावर पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करण्यात आले.



# शिक्षकांचे सेवाविषयक प्रश्न निकाली काढणार

## ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांचे शिष्टमंडळाला आश्वासन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाची राज्याचे ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत राज्यातील शिक्षकांच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या सेवाविषयक समस्यांबाबत सविस्तर चर्चा झाली. मंत्री गोरे यांनी शिक्षकांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आमदार संजय केळकर आणि राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली ही भेट घेण्यात आली. बैठकीत मुख्यालयी वास्तव्य, एमएससीआयटी शुल्क परतावा, शाळांच्या वीजबिलासाठी स्वतंत्र तरतूद व सौरऊर्जा प्रकल्प, रिक्त पदांची पदोन्नतीद्वारे भरती, निवडश्रेणीचा विलंब, विषय शिक्षकांची नियुक्ती, विविध वेतन थकबाकी, वैद्यकीय परतावा, सीपीएफ व एनपीएससंदर्भातील प्रश्न यावर चर्चा करण्यात आली. शिक्षकांना निवडश्रेणी, वेतनश्रेणी व विविध थकीत देयके वेळेत मिळतील यासाठीही पावले उचलण्यात येणार आहेत. शिक्षकांच्या मुख्यालयी वास्तव्याबाबत अनेक शंका दूर करून कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

सेवानिवृत्त शिक्षकांकडून वसूल केलेली एमएससीआयटीची रक्कम परत केली जाईल, असे सांगण्यात आले. (पान २ वर..)



**कार्यरत आणि निवृत्त शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित आहेत. याशिवाय शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त इतर कामांना जुंपले जात आहे. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होतो. सर्वच मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. लवकरच चांगला निर्णय अपेक्षित आहे.**
**-राजेश सुर्वे, राज्याध्यक्ष, प्राथमिक शिक्षक परिषद**

# रायगडात फळबागांचे उद्दिष्ट यंदा दुप्पट

## तीन हजार हेक्टर क्षेत्रावर होणार लागवड; नियोजन पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सन २०२५-२६ या वर्षात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत तीन हजार ४५ हेक्टरवर फळबाग लागवड होणार आहे. आंबा, काजू आणि इतर फळपिकांचा यात समावेश असणार आहे. त्यासाठी असलेले नियोजन कृषी विभागाने पूर्ण केले आहे.

फळबाग लागवडीला चालना देण्यासाठी तसेच पडीक जमीन लागवडीखाली येण्यासाठी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत फळबाग लागवड योजनेचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत गेल्या पाच वर्षात जिल्ह्यात आठ हजार १७९ हेक्टरवर फळबाग लागवड करण्यात आली आहे. यात सहा हजार २३८ हेक्टरवर आंबा, ९८० हेक्टरवर काजू, तर ९५६ हेक्टरवर इतर फळपिकांची लागवड करण्यात आली.



यंदा तीन हजार ४५ हेक्टरवर फळबाग लागवडीचे उद्दिष्ट कृषी विभागाने ठेवले आहे. यात एक हजार ५०० हेक्टरवर आंबा, ९०० हेक्टरवर काजू, तर ६४५ हेक्टरवर इतर फळपीक लागवडीचे उद्दिष्ट असणार आहे. गेल्या वर्षी एक हजार ५८८ हेक्टरवर अशी फळबाग लागवड करण्यात आली होती, ज्याचा दोन हजार ७९० बागायतदारांना लाभ मिळाला होता. या वर्षी दुप्पट क्षेत्रावर फळबाग लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी १५ तालुक्यांमध्ये २०७ कृषी सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### सुपारी लागवडीला प्रोत्साहन मिळणार

राज्य सरकारच्या माध्यमातून फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी भाऊसाहेब फुंडकर योजना २०१८पासून सुरू करण्यात आली आहे, ज्यात १६ फळपिकांचा समावेश होता, मात्र कोकणात सुपारीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जात असूनही या पिकाचा योजनेत समावेश नव्हता. फळबाग योजनेत सुपारी पिकाच्या समावेशासाठी बागायतदार आग्रही होते. त्यानुसार आता यात रोठा सुपारीचा समावेश करण्याच्या सूचना फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी केली आहे.

## मी रमी खेळत नव्हतो -मंत्री कोकाटे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे विधानमंडळात मोबाईलवर रमी खेळतानाचा एक व्हिडीओ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शेअर केला होतो. या प्रकरणावर मंत्री कोकाटे यांनी स्पष्टीकरण देत मी रमी खेळत नव्हतो, असे म्हटले आहे.

मंत्री मंत्री कोकाटे म्हणाले, वरच्या हाऊसला बिझनेस असल्यामुळे मी वर बसलो होतो आणि हाऊस अडजर्न झाले असावे म्हणून खालच्या हाऊसला काय बिझनेस चालू आहे हे पाहण्यासाठी मोबाईल ओपन केला होता. मोबाईल ओपन केल्यानंतर युट्यूबवर येत असताना अशा प्रकारच्या अनेक जाहिराती या ठिकाणी येतात. आता त्या जाहिराती स्किप कराव्या लागतात. त्या मी स्किप करत होतो. ती जाहिरात स्कीप करण्यासाठी मला दोन-तीन सेकंद लागले. त्यांनी १८ सेकंदांचाच दाखवला आहे. त्यांनी आणखी पुढे दाखवला असता, तर स्किप केलेले त्यांनी दाखवले असते ना, पण त्यांना ते दाखवायचे नाही आणि ते विरोधी पक्षनेते दाखवणारच नाही, असेही ना. कोकाटे यांनी म्हटले आहे.

# माथेरानमध्ये पोलिसांकडून बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा

## युनियनही आक्रमक; पर्यटक बेहाल

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ-माथेरान घाटरस्त्यावर वीकेंडला होणाऱ्या वाहतूक कोंडीतून पर्यटकांची सुटका करण्यासाठी नेरळ पोलिसांकडून बेशिस्त वाहनचालकांवर रविवारी (दि. २०) कारवाईचा बडगा उगारण्यात आला. दुसरीकडे या कोंडीसाठी केवळ आम्ही जबाबदार नसल्याचे सांगत टॅक्सीचालक युनियनने वाहतूक सेवा बंद करून पोलीस ठाण्यासमोर ठिय्या दिला. त्यामुळे मधल्या मध्ये माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांचे हाल झाले.

दरम्यान, दुपारी ३ वाजता पोलीस प्रशासन आणि टॅक्सी युनियन यांच्यात सुवर्णमध्य निघून नेरळ-माथेरान-नेरळ सेवा पुन्हा सुरू झाल्याने पर्यटकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला.

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असणाऱ्या माथेरान येथे मान्सून हंगामात पर्यटकांची मांदियाळी पहायला मिळत आहे. येथील हिरवी वनराई, फेसाळणारे धबधबे याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची शनिवार, रविवारी गर्दी होते, मात्र येणाऱ्या पर्यटकांची वाहने तसेच प्रवासी वाहतूक सेवा करणाऱ्या काही चालकांच्या बेशिस्तपणामुळे नाहक माथेरान घाटात वाहतूक कोंडी होते. याचा परिणाम पर्यटनावर होत आहे. (पान २ वर..)

### सामोपचाराने आंदोलन मागे

*या वेळी पोलिसांकडून स्थानिक वाहनचालकांना ड्रेसकोड व अन्य काही सूचना करून एक महिन्याची मुदत देण्यात आली. त्यावर टॅक्सी युनियननेदेखील सकारात्मकता दाखवत आपले आंदोलन मागे घेऊन पर्यटकांच्या सेवेत आपली वाहने पुन्हा सुरू केली.*

# कॅन्सरमुक्त भारतासाठी जनजागृती सत्र



## उलवे परिसरात विशेष संवाद कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हनुमान मंदिर परिसरात उलवे रहिवाशी संघटना यांच्या वतीने आणि लायन्स क्लब ऑफ न्यू बॉम्बे सीबीडी यांच्या सहयोगाने कॅन्सरमुक्त भारत या विषयावर जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात स्वास्थ्य व योगा या विषयावरही विशेष संवाद झाला.

या उपक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ यांचे आशीर्वाद लाभले. मंगलम फाउंडेशनच्या संचालिका अर्चना जैन यांनी सत्राचे प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी कर्करोगासंबंधी जागरूकता वाढवण्यावर भर दिला व योग्य आहार, नियमित तपासणी आणि मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व स्पष्ट केले.

या कार्यक्रमात हनुमान मंदिर समितीचे अध्यक्ष अवधेश महतो प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लायन्स क्लबच्या अध्यक्ष दीपा मोर्य, सचिव श्रीविद्या श्रीनिवासन, आशा पर्धाल आणि किशोर नाईक यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

या सत्राला मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती आणि सर्व सहभागींसाठी हे सत्र माहितीपूर्ण ठरले. समाजात कर्करोगाबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण करण्यात या कार्यक्रमाने महत्त्वाची भूमिका बजावली.

उलवे रहिवाशी संघटना आणि लायन्स क्लब ऑफ न्यू बॉम्बे उइऊ तर्फे सर्व मान्यवर, सहभागी आणि सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# बचत गटाच्या महिलांनी बुजवले रस्त्यातील खड्डे

**उरण : वार्ताहर**

उरण तालक्यातील पिरकोन गावात बस स्टॉप जवळील गतिरोधकासमोर मोठा खड्डा पडला होता त्यामुळे पिरकोनपासून पुढे केलवणे, वशेणी, पुनाडे, सारडे व पिरकोनपर्यंत, नागरिक, रहिवासी आणि रिक्षावाल्यांना या खड्ड्यांचा भरपूर त्रास होत असे ही बाब लक्षात येताच श्री गणेश महिला मंडळ बचत गट यांनी शनिवारी हे खड्डे बुजवण्याचे महिलांनी केले आहे. यासाठी लागणारी दोन टेम्पो खडी आणि गिरीट देण्याचे काम माजी जि.प. सदस्य जीवन गावंड यांनी केले आहे.



श्री गणेश महिला मंडळ हे नेहमीच मदत करीत असते. मागील महिन्यात पाऊस आणि वादळात नागरिकांचे नुकसान झाले होते तेव्हा त्या गरजूंना ही महिला मंडळानी मदत केली आहे.

या वेळी श्री गणेश महिला मंडळ बचत गटाच्या अध्यक्ष लक्ष्मी गावंड, सचिव तथा भाजप उरण तालुका महिला मोर्चा सदस्या बिंदू मुकुंद गावंड, सदस्य शारदा गावंड, सदस्य योगिता गावंड, सामाजिक कार्यकर्ते गणेश गावंड आदी महिला उपस्थित होत्या.

श्री गणेश महिला मंडळ बचत गटाने सामाजिक बांधिलकी समजून चांगले काम केले आहे. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी खारघरमध्ये वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका उद्यान विभाग आणि इन्फिनिटी फाऊंडेशन तसेच विविध महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२०) खारघर येथील सेक्टर २७ ते सेक्टर ३२ अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महापालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.



## पनवेल महापालिका व इन्फिनिटी फाऊंडेशनमार्फत उपक्रम

या कार्यक्रमांतर्गत आज सेक्टर २७ ते खारघर ३२मध्ये रस्त्याच्या कडेला करंज, कदंब, कांचन, बहावा, आपटा अशा विविध १५० वृक्षांचे रोपण करण्यात आले. महापालिकेच्या उद्यान विभागाबरोबर इन्फिनिटी फाऊंडेशन, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय एनएसएस युनिट, रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खारघर, के. एल. ई. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कळंबोली एनएसएस युनिट, सरस्वती अभियांत्रिकी महाविद्यालय खारघर एनएसएस युनिट, डी वाय पाटील एनएसएस युनिटचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहा. आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, रूपेश चित्रुक, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक वैभव ठाकरे, इन्फिनिटी फाऊंडेशन अध्यक्ष आयुफ अकुला, यश दुबे, सरचिटणीस, प्रणय उसाटकर सचिव, समृद्धी पोटे सचिव, शीतल झांजे महिला विकास सचिव, शिव अनशन सदस्य, मानसी वर्तक सदस्य, अविप्रा अमृते, सदस्य कॉलेज, एनएसएस समन्वयक अर्चना इंगोले, शीतल घारगे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नागरी संरक्षण दल, उरण यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसाचे पूर्ण वेळ नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित व सक्षम बनविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन केले गेले. माननीय शशिकांत सिरसाठ (सहाय्यक उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल उरण) यांनी व दत्ताराम गोंधळी, समीर थळी, नितेश घरत, सुमीत कोळी, प्रितम म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना आपत्तीचे प्रकार, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, आपत्तीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी व आपली जबाबदारी इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. व दोरीच्या विविध गाठी व त्याचे उपयोग, आपत्कालीन परिस्थितीत विमोचन करण्याच्या पद्धती, बँडेजचे प्रकार, स्ट्रेचरचा वापर, कृत्रिम शोषण पद्धती, आपातकाळात स्वसंरक्षण इत्यादी विषयी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले व सराव घेतला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उद्घाटन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले व हे प्रशिक्षण निश्चितच सहभागी विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे ठरेल, असे प्रतिपादन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण व एन एस एस कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे,प्रा.सौ.विनिता तांडेल यांनी मेहनत घेतली. महाविद्यालयातील एकुण ७० विद्यार्थ्यांनी हे आपत्ती व्यवस्थापनाचे प्राथमिक प्रशिक्षण यशस्वी पूर्ण केले.




**पनवेल : दिव्य ज्योती जागृती संस्था पुणे यांच्या वतीने श्री देवदुर्ग गुरूपौर्णिमा महोत्सव २०२५चे आयोजन पनवेल येथे करण्यात आला होते. शहरातील आगरी समाज हॉल येथे रविवारी झालेल्या या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात वेदमंत्र उच्चारण, दिव्य गुरु श्री आशुतोष महाराज यांची आरती, भक्ती गीते आणि सत्संग प्रवचन, सामूहिक ध्यान-साधना अशा कार्यक्रमांचा आयोजन या वेळी करण्यात आले होते.**

# राबगाववाडी येथे छत्र्यावाटप

## आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त पाली तालुक्यातील राबगाव वाडी येथील महिलांना नुकतेच छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

आमदार महेश बालदी यांची शिकवण आहे की, गोरगरिबांना मदत करायला पाहिजे हे उद्दिष्ट समोर ठेऊन भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी पुढाकार घेऊन राबगाव वाडीवर मदत केली.



या वेळी भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य जीवन गावंड, रायगड जिल्हा संघटक शिवसेना महेंद्र पाटील, ओबीसी उपाध्यक्ष महेश गावंड, ज्येष्ठ कार्यकर्ते बलवंत गावंड, युवा नेतृत्व हर्षद भुरे, हर्ष गावंड उर्फ बॉबी आदी राबगाव येथील बंधू आणि भगिनी आदी उपस्थित होते.

# तळोजा कारागृहात कैद्यावर हल्ला

## मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपींसह दोघांविरुद्ध गुन्हा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा कारागृहात बंदीस्त असलेल्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी शामिल साकिब नाचण आणि इरफान मुस्तफा लांडगे या दोघांनी मोक्कांतर्गत कैदेत असलेल्या गिरीश कुमारन नायर याच्यावर रंगकाम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पत्र्याच्या सहाय्याने हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात नायर जखमी झाला आहे. या घटनेनंतर खारघर पोलिसांनी दोन्ही हल्लेखोर आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी शामिल साकिब नाचण आणि इरफान मुस्तफा लांडगे तसेच जखमी गिरीष नायर असे तिघेही तळोजा कारागृहातील सर्कल १ मधील वेगवेगळ्या बॅरेकमध्ये बंदिस्त आहेत. १८ जुलै रोजी सर्व कैदी बॅरेक क्रमांक १ मध्ये असताना शामिल नाचण आणि इरफान लांडगे या दोघांनी जुन्या भांडणाच्या वादातून मोक्कातर्गत कैदेत असलेला आरोपी गिरीश नायर याच्यावर रंगकाम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पत्र्याच्या सहाय्याने हल्ला करुन त्याला जखमी केले.

या हल्ल्यात कैदी गिरीष नायर गंभीररित्या जखमी झाल्याने कारागृह पोलिसांनी त्याला तत्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचारानंतर पुन्हा त्याला कारागृहात आणण्यात आल्याची माहिती तळोजा कारागृहाचे अधीक्षक प्रमोद वाघ यांनी दिली. या प्रकरणी खारघर पोलिसांत आरोपी शामिल नाचण आणि इरफान लांडगे या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याचेही वाघ यांनी सांगितले.

# चिरनेर परिसरातील ओसाड जमिनीत आदिवासी बांधवांकडून भाताची लागवड

## ◆ कृषी अधिकाऱ्यांकडून 'चारसूत्री'चे मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात अलीकडे वाढती मजुरी, मजुरांचा अभाव आणि निसर्गाच्या अनियमितपणा यामुळे बहुतांशी शेतकऱ्यांनी शेतीकडे दुर्लक्ष केले आहे, मात्र आदिवासी बांधवांनी चिरनेर परिसरातील नागरिकांच्या ओसाड शेत जमिनीत भातरोपांची लागवड करून या ओसाड जमिनी लागवडीखाली आणल्या आहेत. पोटाची भूक भागविणाऱ्या काळ्या आईला महत्व देऊन, या ओसाड जमिनीत भात लागवड करून चिरनेर परिसरातील आदिवासी बांधवांनी समाजातील शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.



वर्षाचे बारा महिने मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारा हा समाज अलीकडे विकासाच्या मुख्य प्रवाहात येत असून, त्यांना अन्नाचे महत्त्व काय असते हे समजले आहे. दरम्यान चाणजे ता. उरण येथील शेतकरी ज्ञानेश्वर शांताराम म्हात्रे यांच्या शेतावर काल १८ जुलै रोजी आदिवासी बांधवांच्या कृतीतून, पट्टा पद्धतीने भात लागवड करून, आदिवासी बांधवांना तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ - नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली उरणच्या कृषी अधिकाऱ्यांनी पट्टा पद्धतीच्या लावणीचे व चारसूत्री लावणी पद्धतीचे महत्त्व पटवून दिले आहे.

या वेळी तालुक्यातील आदिवासी वाड्यातील आदिवासी बांधवांनी पट्टा पद्धतीच्या भात लागवडीच्या प्रात्यक्षिकात भाग घेतला होता. त्यांना कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी एस.डी गटकळ, उपकृषी अधिकारी ए.डी. बरकूल तसेच सहाय्यक कृषी अधिकारी आदिका पानसरे यांनी मार्गदर्शन व प्रात्यक्षिके करून दाखविली.

# राज्यशास्त्र विद्यार्थ्यांची पंचायत समितीला अभ्यास भेट यशस्वी

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरणमधील वीर वाजेकर महाविद्यालयातील राज्यशास्त्र (तृतीय वर्ष) विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पंचायतराज दिनाच्या निमित्ताने उरण येथील तालुका पंचायत समिती कार्यालयास अभ्यास भेट (स्टडी टूर) यशस्वीरित्या झाली.

राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप घोडके यांच्या संकल्पनेतून व तालुका पंचायत समिती प्रमुख समीर वाठारकर व त्यांच्या सर्व अधिकारी, कर्मचारी वर्गाच्या सहकार्याने तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांच्या मार्गदर्शनाने सदरचा अभ्यास दौरा सर्वार्थाने यशस्वी झाल्याची भावना या अभ्यास सहल मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आणि पंचायत समिती अधिकारी वर्गाने व्यक्त केले.



उरण पंचायत समिती सहविस्तार अधिकारी, इतर अधिकारी सर्वश्री मिलिंद घाटावकर, गिरीराज धिंगरा तसेच पशुसंवर्धन, आरोग्य, शिक्षण, सामान्य प्रशासन अधिकारी - कर्मचारी यांनी पंचायत समिती, ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांचे संबंध, भूमिका, कार्य व विविध योजना सविस्तर पणाने मांडल्या. त्यानंतर राज्यशास्त्र विद्यार्थी सायली कडू , प्रणवी राजगे, सेजल ठाकूर, ओंकार चौलकर, सानिका जाधव, इंदर पांचाल, अदिती लवे, पुनम लोखंडे व इतर विद्यार्थ्यांनी अधिकारी वर्गांच्या चर्चा सत्रात प्रश्न व मनोगताच्या माध्यमातून सहभाग नोंदवला.

महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग प्रतिवर्षी राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्षामध्ये लोकशाही व्यवहार, संसदीय प्रक्रिया कशा पद्धतीने चालते हे प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन अनुभवातून दाखवण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असतो. आत्तापर्यंत तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती, नागरी संस्था, आदिवासी पाडे, शाळा व गतवर्षी मानवी हक्क आयोग, मंत्रालय व विधिमंडळ सभागृहातील कामकाज डॉ. घोडके यांच्या विशेष प्रयत्नातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवण्यात आले. अशा या अभिनव शैक्षणिक प्रयोगाचे महाविद्यालय विकास समितीचे सर्व सन्माननीय सदस्य व शिक्षण प्रेमींनी नेहमीच सर्वत्र कौतुक झाले आहे.

# शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रमाला प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

न्हावा शेवा सी.एच.ए.आधार सामाजिक संस्थेमार्फत आजतागायत आधार चषक, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र चिकित्सा शिबिर, अपघात ग्रस्तांना आर्थिक मदत असे अनेक उपक्रम राबवले गेले. त्याच अनुषंगाने सामाजिक बांधिलकी जपत न्हावा शेवा सी.एच.ए.आधार सामाजिक संस्थेच्या माध्यमातून उरण, पनवेल आणि पेण विभागातील तब्बल १९ गावांतील २२ रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये एकूण २१७७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या साहित्यात एक पॅड आणि एक कंपास पेटीचे वाटप करण्यात आले. या २१ गावांमध्ये प्रामुख्याने खोपटे, कोप्रोली, पाणदिवे, मोठीजुई, कळंबुसरे, चिरनेर, भोम, टाकीगाव, विंधणे, आवरे, पाले, पिरकोन, सारडे, कडापे, वशेणी, पुनाडे, केळवणे, दादर, दिघाटी आदी विविध गावांचा समावेश आहे.या उपक्रमाच्या वेळी रा. जि. प. शाळांमधून सर्वच विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. आणि उपक्रमामुळे सर्व नागरिकांकडून न्हावा शेवा सी.एच.ए.आधार सामाजिक संस्थेचे भरभरून कौतुक होत आहे.



## संपादकीय

# अधिवेशनाची फलनिष्पत्ती

राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप शनिवारी वाजले. या अधिवेशनात महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकासह महत्त्वाची १६ विधेयके मंजूर करण्यात आली. त्याचप्रमाणे विविध विषयांवर मंथन झाले. आता पुढील हिवाळी अधिवेशन नागपूर येथे ८ डिसेंबरपासून सुरू होणार आहे.

**राज्यातील विविध प्रश्नांवर, गंभीर मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी तसेच शासनाद्वारे केलेल्या कामांवर चर्चा करण्यासाठी, राज्यहितासाठी आवश्यक असलेली नवीन धोरणे राबवण्यासाठी अशा विविध गोष्टींसाठी वर्षामध्ये तीन वेळा अधिवेशनाचे नियोजन केले जाते. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा अशा तीन ऋतुंच्या वर्गीकरणाप्रमाणे उन्हाळी अर्थात अर्थसंकल्पीय, पावसाळी आणि हिवाळी अधिवेशन असे प्रकार पडतात. त्यातील उन्हाळी आणि पावसाळी अधिवेशन हे राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहरात, तर हिवाळी अधिवेशन राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरमध्ये आयोजित केले जाते. नुकतेच पावसाळी अधिवेशन झाले. या अधिवेशनात एकूण १६ विधेयके मंजूर करण्यात आली. त्यामध्ये अनुसूचित जाती आणि जमाती आयोगांना वैधानिक दर्जा देणारी विधेयके, महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक, गौण खनिकर्म प्राधिकरण विधेयक, त्र्यंबकेश्वर-नाशिक कुंभमेळा प्राधिकरण विधेयक आणि मकोका कायद्यात अंमलपदार्थांचा समावेशासंबंधातील सुधारणा अशा अनेक महत्त्वाच्या विधेयकांचा समावेश होता. त्याचप्रमाणे पुरवणी मागण्यांतून मेट्रो प्रकल्प, महानगरपालिका, जिल्हा परिषद, तसेच पिण्याचे पाणी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शिष्यवृत्ती योजना यांना भरघोस निधी वितरित करण्यात आला आहे. दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या भत्त्यांमध्ये १५०० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आला असून, शिक्षक टप्पा अनुदानदेखील जाहीर करण्यात आले तसेच अनुकंपा धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. पशुसंवर्धन क्षेत्राला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय या अधिवेशनात घेण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समारोपावेळी सांगितले. अधिवेशनाच्या कामकाजाशिवाय विविध बैठकांच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गडकोट 'युनेस्को'च्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा हा महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण आहे. याबद्दल दोन्ही सभागृहात आनंद व्यक्त करण्यात आला तसेच महाराष्ट्राचे सुपूत्र, देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा हृद्य सत्कारही या अधिवेशन काळात करण्यात आला. एकीकडे अधिवेशनात अनेक गोष्टी मार्गी लागत असताना विधीमंडळ मेन पोर्च येथे दोन सदस्यांच्या अभ्यागतांदरम्यान मारहाणीने गालबोट लागले. याबद्दल नंतर दोन्ही सदस्यांनी खेद व्यक्त केला, परंतु सभागृहाची प्रतिष्ठा मलिन झाली. ही बाब विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने घेत सर्वांनी सभागृहाची प्रतिष्ठा जपली पाहिजे, अशा शब्दांत सूचित केले. आता पुढील हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपुरात होईल. महाराष्ट्राचे पावसाळी अधिवेशन आटोपल्यानंतर तिकडे देशाची राजधानी दिल्लीत संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होत आहे. देशाच्या दृष्टीने ते महत्त्वपूर्ण असून तिथेही दोन्ही सभागृहात विविध सकारात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे. यानिमित्ताने कोणकोणती विधेयके मंजूर होतात हे पाहणे औत्सुक्याचे असेल.**

# वाहतुकीची कोंडी फुटण्यासाठी कर्जत येथे बायपास हाच रामबाण उपाय






**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुक्यात अडीच हजारपेक्षा जास्त रिसॉर्ट आणि फार्महाऊस आहेत. यामध्ये जास्त संख्या मुंबईकर शेतकऱ्यांची व रिसॉर्ट मालकांची आहे. वीक एंडला यामधील अनेक जण आपल्या फार्महाऊसवर येतात आणि दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी जातात. त्यामुळे शनिवार व रविवारी कर्जत-मुरबाड रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होते तसेच मुरबाड, शहापूर कडे जाणारे व तिकडून येणारे कंटेनर याच मार्गाने येतात. त्यामुळे वाहतूक कोंडी वेळोवेळी होते.


आता तर दररोजच वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. परवाच वाहतूक कोंडीच्या समस्येविषयी आढावा बैठक झाली. त्यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी संबंधित अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. त्यांनी अनेक सूचना केल्या. त्या जरी प्रत्यक्षात आणल्या तर वाहतूक कोंडीची समस्या तेव्हढ्यापुरता सुटेल. यावर कायमचा उपाय म्हणून मुरबाड, शहापूरकडे जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी व तालुक्याच्या अन्य भागात जाणाऱ्या वाहनांसाठी बायपास करणे आवश्यक आहे. तसा उड्डाणपूल व्हावा असा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठवण्यात आला आहे. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याला मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा आहे.

१९८०पूर्वी कर्जत शहरातून एसटी बस जात असत. कर्जतचे एसटी आगार पश्चिम बाजूला असल्याने कर्जतच्या पूर्व भागात जाणाऱ्या एसटी बस भिसेगावमधून आल्यावर जुन्या रेल्वे फाटकातून येऊन मुख्य बाजारपेठेतून लोकमान्य टिळक चौकातून श्रीराम पूलावरून जात असत आणि येताना त्या श्रीराम पुलावरून महावीर पेठमार्गे स्टेशनला येऊन जुन्या रेल्वे फाटकातून एसटी आगारामध्ये जात असत. त्यावेळी रेल्वेचा पूल नव्हता. एसटी बस बाजारपेठेतून आरामात जात असत. आता याच बाजारपेठांमधून साधे चालत जाताना जीव मुठीत घेऊन चालावे लागते.

फेरीवाले, हातगाडीवाले रस्त्यावर बसतात. त्यात भर म्हणून शासनाने रिक्षा परवाने खुले केले. त्यामुळे अनेक बेरोजगार युवक रिक्षा व्यवसायात पडले. रस्ते तेच मात्र वाहनांची संख्या दुप्पट, तिप्पट झाल्याने त्यांचे नियोजन करता करता पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज कसरत होते. कर्जत शहरात कोणत्याही चौकात मोकळी जागा नाही. सर्वच ठिकाणी रिक्षावाले अगदी बिनदिक्कतपणे रिक्षा उभ्या करतात. दररोज रिक्षाचालक आणि अन्य वाहनधारक यांची भांडणे होत असतात, मात्र एक आहे ज्यावेळी आरटीओचा कॅम्प असतो तेव्हा यातील काही रिक्षा आडबाजूला लावल्या जातात. याकडेही दुर्लक्ष केले जाते. दोन वर्षांपूर्वी टोविंग वॅन उपलब्ध होती, मात्र पोलीस प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन याची जबाबदारी घेत नसल्याने ती बंद आहे. पोलीस ठाण्यात कर्मचारीही कमी आहेत. त्यामुळे त्याचाही नाईलाज आहे.

टोविंग वॅन सुरू असताना चांगली शिस्त लागली होती. वाहतूक कोंडीची समस्याही बऱ्यापैकी सुटली होती. दोन महिन्यापूर्वी तत्कालीन पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी वाहतूक समस्या गांभीर्याने घेऊन स्वतः टिळक चौकात उभे राहून शिस्त मोडणाऱ्या वाहनचालकांवर दांडात्मक कारवाई केली होती, मात्र आता सारे पुन्हा सुरू झाले आहे.

परवा या वाहतूक कोंडीला वैतागून आमदार महेंद्र थोरवे यांनी विशेष आढावा बैठक घेऊन संबंधित अधिकारीवर्गाची कानउघाडणी केली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार असूनही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पोलिसांनी सुरुवात केली. त्यात ते यशस्वी झाले. ही तात्पुरती मलमपट्टी झाली. दोन-तीन वर्षांपूर्वी रेल्वेपुलालगत मुद्रे बुद्रुकच्या बाजूला नवीन उड्डाणपूल बांधण्यासाठी चाचपणी झाली. अगदी मोजणीसुद्धा झाली. त्यावेळी पुलाच्या बाजूला रहात असलेले रहिवाशी घाबरले होते, मात्र त्यानंतर काहीच हालचाल झाली नाही. कर्जत तालुक्यातील ९५ टक्के गावे पूर्व बाजूला आहेत त्यामुळे चारफाटा आणि श्रीराम पुलावर वाहतूक कोंडी होते. परिणामी विद्यार्थी, रुग्ण तसेच रोज काम-धंद्यानिमित्त जाणारे-येणारे आणि स्थानिकांना या कोंडीचा त्रास सहन करावा लागतो.




भाजप किसान सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांनी ही वाहतूक कोंडी सुटवी म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांची तीन-चार वेळा भेट घेतली. प्रत्येक वेळी कर्जतसाठी बायपास करावा, अशी मागणी ते त्यांच्याकडे करीत आले आहेत. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून नितीन गडकरी यांनी त्यांची मागणी मान्य केली आहे.

भिसेगाव खिंडीतून थेट लाखरनपर्यंत उड्डाण पूल असावा असे गोगटे यांनी सूचित केले असून ना. गडकरी यांनी त्यांचा आराखडा समजून घेतला आहे. उद्यापासून होणाऱ्या संसदीय अधिवेशनात रेखांकन मंजूर होईल, अशी अपेक्षा आहे. रेखांकन मंजूर झाल्यानंतर संसदेच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात या उड्डाणपुलाला मंजुरी मिळेल. १०० ते ११० कोटी रुपयांचे हे काम असेल, असे गोगटे यांनी सांगितले. हा उड्डाणपूल झाल्यावरच कर्जतमधील वाहतूक कोंडी कायमची सुटेल.



## बदलते तंत्रज्ञान

## लवकरच लॉँच होणार 'रेडमी'चा बजेट स्मार्टफोन

नवीन बजेट स्मार्टफोन खरेदी करायचा आहे का? थांबा, थोडा धीर धरा, कारण लवकरच Redmiचा नवीन बजेट स्मार्टफोन लॉँच केला जाणार आहे. ग्लोबल मार्केट्समध्ये कंपनीच्या बजेट स्मार्टफोन Redmi 15Cची लवकरच एंट्री होणार आहे. Redmi 15C हा स्मार्टफोन कधी लॉँच केला जाणार याबाबत अद्याप कंपनीने कोणतीही माहिती दिलेली नाही, मात्र या स्मार्टफोनच्या लॉँचिंगपूर्वीच आता त्याचे अनेक फीचर्स समोर आले आहेत. कंपनीचा नवीन बजेट स्मार्टफोन Redmi 15C हा Redmi 14C चा सक्सेसर असू शकतो. Redmi 14C ऑगस्ट २०२४ मध्ये काही भागांत लॉँच करण्यात आला होता. लिस्टिंगनुसार फोनमध्ये MediaTek Helio G८१ चिपसेट, 4GB R-M², 6,000mAh बॅटरी आणि ५०-मेगापिक्सेल डुअल रियर कॅमेरा युनिट असण्याची शक्यता आहे.




युरोपमधील काही देशांमध्ये आगामी Redmi १५C ची किंमत किती असू शकते याचा अंदाज लावण्यात आला आहे. इटलीमध्ये Redmi 15C या स्मार्टफोनच्या 4GB + १२८GB व्हेरिअंटची किंमत E१३३.९० म्हणजेच सुमारे १३,४०० रुपये असण्याची शक्यता आहे. Redmi १५Cच्या हायर 4GB + २५६GB व्हेरिअंटची किंमत E१५४.९० म्हणजेच सुमारे १५,५०० रुपये असण्याची शक्यता आहे. Redmi १५C हा फोन मिंट ग्रीन, मूनलाइट ब्लू, मिडनाइट ग्रे आणि ट्वाइलाइट ऑरेंज कलर ऑप्शन्समध्ये लॉँच केला जाऊ शकतो.

Redmi 15C मध्ये १२०Hz रिफ्रेश रेट सपोर्टसह ६.९-इंच LCD स्क्रीन दिली जाण्याची शक्यता आहे. हा फोन चशवळरढशज्ञ Helio G८१ प्रोसेसरसह लॉँच केला जाण्याची शक्यता आहे. या फोनमध्ये ४GB रॅम आणि २५६GB पर्यंत ऑनबोर्ड स्टोरेजसह जोडण्यात आले आहे. लिस्टिंगनुसार, फोन Xiaomiच्या HyperOSवर चालणार आहे.

फोटोग्राफीसाठी Redmi १५Cमध्ये डुअल रियर कॅमेरा यूनिट दिला जाण्याची शक्यता आहे, ज्यामध्ये AI-बॅक्ड ५०-मेगापिक्सेल मेन सेंसर आणि १३-मेगापिक्सेल सेल्फी शूटर देण्यात आाल आहे. फोनमध्ये ३३W वायर्ड फास्ट चार्जिंग सपोर्टसह ६,०००mAh ची बॅटरी दिली जाण्याची शक्यता आहे. हे हॅंडसेट जुलैमध्ये किंवा या वर्षाच्या अखेरीस लॉँच होऊ शकतात.

# प्रतिभावान गीतकार आनंद बक्षी



**निमित्त**

आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. बक्षी यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असताना वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर, १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले.

कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते, मात्र त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी.

शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. १९५८मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते. सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणार्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले.

या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार (जीने की राह), बिंदिया चमकेगी (दो रास्ते), सावन का महीना (मिलन), मैं शायर तो नहीं (बॉबी), परदा है परदा (अमर अकबर अँथोनी), आदमी मुसाफिर है (अपनापन), डफलीवाले (सरगम), ओम शांती ओम (कर्ज) ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन (आरडी) यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है (कटी पतंग), रैना बीती जाए (अमर प्रेम), महेबूबा महेबूबा (शोले), परबत के पीछे (महेबूबा), सावन के झूले पडे (जुर्माना), दम मारो दम (हरे राम) ही आरडी-आनंद बक्षी यांची काही गाजलेली गाणी.

कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे ३० मार्च २००२ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

## पावसाळ्यातही वाढतोय डिहायड्रेशनचा धोका!

उन्हाळ्यात जशी शरीरातील निर्जलीकरणाची समस्या निर्माण होते तशीच समस्या पावसाळ्यातही निर्माण हेऊन आरोग्याचे काही प्रश्न निर्माण होऊ शकतात हे लक्षात घेऊन पावसाळ्यातही पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे.



पावसाळ्यात केवळ अतिसार, बद्धकोष्ठताच नाही तर डिहायड्रेशन हीदेखील एक सामान्य घटना आहे. जेव्हा तुमचे शरीर जेवढ्या द्रवपदार्थाचे सेवन करते त्यापेक्षा जास्त द्रवपदार्थ गमावते तेव्हा डिहायड्रेशनची समस्या होते. याचा तुमच्या अवयवांच्या कार्यावर परिणाम होतो आणि मूत्रपिंडांवर ताण येणे, थकवा जाणवणे, चक्कर येणे, उष्माघात आणि वेळीच उपचार न केल्यास रुग्णालयात दाखल होणे यासारख्या गंभीर गुंतागुंत होऊ शकतात. कमी तापमानामुळे पावसाळ्यात लोकांना तहान कमी लागते, पण याचा अर्थ असा नाही की त्यांच्या शरीराला गरज नाही.

पावसाळ्यात गॅस्ट्रोइंटेस्टाइनल इन्फेक्शन खूप सामान्य असतात आणि त्यामुळे अतिसार आणि उलट्या होऊन द्रव आणि इलेक्ट्रोलाइट जलदरित्या कमी होतात, ज्यामुळे डिहायड्रेशनचा धोका वाढतो. कामाच्या वेळी किंवा प्रवासादरम्यान पुरेसे पाणी न प्यायल्याने व जास्त घाम आल्यानेदेखील डिहायड्रेशनची समस्या सतावत असल्याचे मुंबईतील झायनोव्हा रूग्णालयातील इंटरनल मेडिसिनचे डॉ. निमित नागदा यांनी सांगितले.

बाह्य रुग्ण विभागात उपचाराकरिता येणाऱ्या २५ ते ५५ वयोगटातील १०पैकी ७ व्यक्तींमध्ये तोंड आणि ओठ कोरडे पडणे, थकवा आणि अशक्तपणा जाणवणे, गडद पिवळ्या रंगाची लघवी किंवा लघवी कमी होणे, चक्कर येणे किंवा डोकेदुखी आणि स्नायूंमधील वेदना अशा तक्रारी आढळून आल्याचे शीव रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ मोहन जोशी यांनी सांगितले.ते म्हणाले डिहायड्रेशनच्या उपचारांमध्ये शरीरातील पाण्याची पातळी प्रमाणात राहील याकरिता ओआरसचे सेवन करणे आणि गंभीर प्रकरणांमध्ये आयव्ही फ्लुइड्सद्वारे उपचारांचा केले जातात. प्रत्येकाने डिहायड्रेशनची समस्या टाळण्यासाठी पुरेसे पाणी पिण्याची आणि हायड्रेटेड राहण्याची खात्री करा.


# मुगवली येथील रस्ता खड्डेमय

**माणगाव : बातमीदार**

श्री क्षेत्र स्वयंभू गणपती मंदिरामुळे प्रसिद्ध असलेलं मुगवली गाव रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. प्रत्येक वर्षी गणेशोत्सवाच्या काळात हजारो भाविक इथे दर्शनास येतात. गावात भक्तीचा महासागर उसळतो पण या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मात्र खड्डे आणि खड्डेच आहेत. म्हणूनच २१ व्या शतकातील विकासाची स्वप्न पाहताना बोलावे लागते इथे श्रद्धा आहे, पण रस्ताच नाही.

मुंबई-गोवा महामार्गावरूनच अगदी काही मिनिटांवर असलेले हे गाव आज रस्त्याच्या अभावामुळे अक्षरशः तुटकपणे जगत आहे. गावात जाणारी साधी एसटी बसची सुविधा नाही. स्थानिकांना आणि विद्यार्थ्यांना येथुन दररोज पाच किलोमीटरची खडतर पायपीट नाहक सहन करावी लागते. सायकलने जायचं तर खड्ड्यांमुळे सायकल वारंवार नादुरुस्त होते. यामुळेच येथील शाळकरी मुलं त्रस्त, रस्त्यावरून एखादा ट्रक गेला तर खड्ड्यातील चिखल उडून आमची दप्तरे व पुस्तके गणवेश भिजतात, अशी व्यथा या लहान विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

वृद्ध लोकांना तर चालणंच अशक्य झाल्याचे म्हटले आहे आणि गणेशभक्तांसाठीही हा रस्ता खुप त्रासदायक ठरतो. येथील स्थानिक सांगतात, गणेशोत्सवात आणि इतर सणांच्या काळात गावात भक्तांची खुपच गर्दी असते, पण या मंदिरात येण्या जाण्याचा मार्ग खुप खडतर खड्डेमय झाला आहे. आमचे मायबाप शासनाकडे अनेकदा मागणी करुनही जनता जनार्दनासाठी रस्ता कधी खड्डेमुक्त होऊन सुखमय होईल? याची वाटच बघावी लागते, हे दुर्दैवच आहे. संबंधित शासनकर्त्यांना श्री गणपती बाप्पा सुबुद्धी देवो! मुगवलीच्या साक्षात स्वयंभु बाप्पाकडे आता ग्रामस्थांना हे साकडे घालण्याशिवाय अन्य पर्याय नाही असे म्हणावे लागत आहे.



## तळा येथे मंत्री तटकरेंचा जनता दरबार

**तळा :** महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शनिवारी (दि.१९) डॉ.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती तळा येथे विविध विषयांवर जनता दरबार पार पडला.

या वेळी प्रांताधिकारी डॉ.संदिपान सानप, तहसिलदार स्वाती पाटील, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, विविध खात्यांचे प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते. रस्ते, पाणी योजना, एसटी, आदिंबाबत सामाजिक व व्यक्तीगत अनेक प्रश्नांना मंत्री तटकरे यांनी सर्व प्रश्न सोडविण्या विषयी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तक्रारींचे निराकरण करण्यात येईल, असेही मंत्री तटकरे म्हणाल्या.

## महावितरण कंत्राटी कामगारांना रेनकोटचे वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघाचे खा. सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पोलादपूर येथील महावितरण कंपनीतील आऊट सोर्सिंग कंत्राटी कामगारांना रेनकोट भेट देण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादी कांग्रेस तालुका अध्यक्ष विठोबा पार्टे, शहरअध्यक्ष अजित खेडेकर, माजी सभापती दिलीप भागवत, नगरसेवक स्वप्नील भुवड, अजय सलागरे, नितीन मधुकर शेठ, एडव्होकेट सचिन गायकवाड, नितीन आरडे, सकपाळ आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी महावितरण कंपनीतील आऊट सोर्सिंग कंत्राटी कर्मचाऱ्यांनी गेल्या अनेक वर्षात आम्हाला कोणीही मदत केली नाही तसेच आम्ही दिवस-रात्र मेहनत करत असतो ऊन पाऊस पण पहात नाही, पण आज आमची दखल खासदार सुनील तटकरे यांनी त्याची दखल घेतल्याचे मनोगतात सांगितले.



### जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP M.A./७७/२०२५**

**नारायण तुकाराम चन्नल आणि इतर १** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**संतोष विंदेश्वर साह** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**रॉयल सुंदरम जनरल इन्शु.कंपनी लिमिटेड** — **विमाकार**

**प्रति,**
**संतोष विंदेश्वर साह**
**पत्ता-** घर क्रमांक १६५, पेंढार नावडे, पनवेल तळोजा मजकुर पनवेल ४१०२०८, मुंबई, महाराष्ट्र.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **१३-०८-२०२५** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्री. संजय किशनराव चौदंते** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस दिनांक **०८-०४-२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
सदस्य
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१

## मुरुड-नालासोपारा एसटी बसची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील बहुसंख्य रहिवासी नोकरी व्यवसायानिमित्त मुंबई उपनगरांमधील वसई, विरार, नालासोपारा आदी भागात वास्तव्यास गेले आहेत. त्यांना सणासुदीला व अन्य कामांसाठी येण्याजाण्यासाठी मुरूड-नालासोपारा ही एसटी बस घोडबंदर मार्गे सुरु करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा रायगड जिल्हा परिषदेच्या माजी समाजकल्याण समिती सदस्या नम्रता अजित कासार यांनी केली आहे.

याबाबत मुरूड आगार व्यवस्थापक शिंदे यांनी सांगितले की, गाडी सुरू करण्यासाठी विभाग नियंत्रक यांच्याकडून आदेश येताच ही गाडी सुरू करण्यात येईल. आम्ही निवेदन वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवले आहे.

## विद्यार्थ्यांनी गिरवले लोकशाहीचे धडे

**रोहे : प्रतिनिधी**

शालेय शिक्षणातच बाह्य बौद्धिक ज्ञान व्हावे या दृष्टिकोनातून रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा शेणवई येथील विद्यार्थ्यांनी लोकशाहीचे धडे गिरवले आहेत.

रा. जि. प. केंद्रशाळा शेणवई येथे आंनदी शनिवार अंतर्गत मुलांमध्ये लोकशाही विषयी जन जागृती व्हावी, देशाच्या भावी नागरिकांना मतदान प्रक्रियेची ओळख व्हावी. या हेतूने शाळेच्या मुख्यमंत्रीपदाची निवडणूक घेण्यात आली. या वेळी सर्व प्रथम मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. यामध्ये केंद्राध्यक्ष म्हणून कुमार अर्णव साखीलकर, मतदान प्रतिनिधी म्हणून ख़ुशी वालेकर, विधी शिंदे, परी झावरे, प्रिन्स शिंदे, निपुल झावरे यानी काम काज पाहिले. मुख्यमंत्री पदासाठी वैष्णवी मढवी, संभव मढवी व पार्थ देशमुख यांच्या मध्ये चुरस पाहायला मिळाली सर्व प्रथम सर्व उमेदवारांनी मतदारांना आपली भूमिका, ध्येय स्पष्ट केली. एकूण ७० मुलांपैकी ६३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. जवळपास ९० टक्के मतदान झाले. निवडणूक निरीक्षक म्हणून विजय वेळे, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सुर्वे मॅडम, सगायकवाड मॅडम यांनी काम पहिले. तर निवडणूक सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी गांगड मॅडम व प्रसाद फड यांनी सहकार्य केले. निवडणूक अत्यंत खेळी मेळीच्या वातावरणात पार पडली. मत मोजणी सोमवारी होऊन निकाल सोमवारीच जाहीर होणार आहे. मुलांनी या लोकशाहीच्या प्रकियेचा सुखद अनुभव घेतला.



## चोरढे हायस्कूलमध्ये वह्या वाटप कार्यक्रम



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील दिनाभाई मोरे सानेगाव शिक्षण संस्थेचे चोरढे येथील महात्मा गांधी विद्यामंदिर येथे इयत्ता पाचवी ते दहावी मधील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी सोमजाई क्रीडा मंडळ मुंबई खरसई या मंडळातर्फे शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम झाला.

या मंडळाचे संस्थापक चंद्रकांत खोत यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सालाबाद प्रमाणे या वर्षी सुधा वह्या व शैक्षणिक साहित्याचे मोठ्या प्रमाणात वाटप केले. या वेळी इयत्ता पाचवी ते दहावी मधील सर्व शालेय विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच वह्या व अन्य उपयोगी शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

कार्यक्रमासाठी या वेळी या शाळेचे अध्यक्ष धर्मा भोईर, उपाध्यक्ष काशिनाथ तांबडे, हरिचंद्र पाटील, मुख्याध्यापिका मधुरा भिडे, थोरबोल सर, लिपीक महेश डोलकर, रवींद्र ठाकूर,मंगेश चोरधेकर, कृष्णा शेडगे, पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जयधर पाटील सर यांनी केले. आयोजन संचालक अनिल चोरधेकर यांनी केले होते.

## सार्तिडे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील सार्तिडे राजिप शाळेत विदयार्थ्याना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम नुकताच झाला. आनंदी फांउडेशनच्या स्तुत्य उपक्रमातून अशोक तावडे व आदिती तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

सार्तिडे राजिप शाळा येथे शनिवारी (दि.१२) विद्यार्थ्याना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आनंदी फांउडेशनच्या वतीने घेण्यात आला. या वेळी आनंदी फाउंडेशनच्या वतीने अशोक तावडे व आदिती तावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा अमृता म्हात्रे व प्रिती म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीसह सार्तिडे ग्रामस्थ व पालकवर्ग यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास सार्तिडे राजिप शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण दरणे व उपशिक्षक जगदीश चवरकर यांची मार्गदर्शन लाभले.



## निवृत्त रेल्वे कामगारांसाठी उम्मीद कार्ड शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

निवृत्त रेल्वे कामगारांना आपल्या आरोग्यविषयक सेवा कोणत्याही चांगल्या दवाखान्यात घेण्यासाठी लागणाऱ्या उम्मीद कार्डचे शिबिर कर्जत रेल्वे स्थानकात आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ अनेक निवृत्त रेल्वे कामगारांनी घेतला.

रेल्वे कामगार किंवा निवृत्त रेल्वे कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी कल्याण आणि भायखाळा येथील रेल्वेच्या हॉस्पिटलमध्ये उपचार करून घ्यावे लागतात, मात्र उम्मीद कार्ड असल्यास कोणत्याही चांगल्या दवाखान्यात घेता येतील. यासाठी उम्मीद कार्ड शिबिराचे आयोजन कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १ वर आयोजित करण्यात आले होते. या वेळी आत्माराम निघोजकर, सुनील चव्हाण, गजानन गुरव, रामचंद्र कडू, बबन गायकवाड, चंद्रकांत ओंबळे, गणपत मुंढे, अशोक बॅनर्जी, बबन रुठे, मधुकर पवार, जयकृष्ण मलातपुरे आदी उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल **श्री आनंद अच्युतराव पालकर यांनी मौजे हरिग्राम ता. पनवेल, जि. रायगड** येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे हरिग्राम , ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| हरिग्राम | प्रकाश नामदेव म्हात्रे | ६१ | १ | ०-२३-६०<br>०-०१-८० | ५-१९ |
| | | | | **०-२५-४०** | |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

**दिनांक : १९/०७/२०२५**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. प्रधान मधुकर पाटील**
ऑफिस नं.१३५, पहिला मजला, नगर पालिका कॉम्पलेक्स, छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळ्याच्या पुढे, पनवेल,जि. रायगड-४१०२०६, मोबाईल. ९३२४३७५५०२, ९५४५५९९९९

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र / करारनामा)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे इरादापत्र दिले असून **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र हे.आर. | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | उलवे ४३२ | गव्हाण ५५३ | ३४/१२<br>३३/६<br>३१/९<br>३१/७<br>३०/१४ | ०-५-०<br>०-३-०<br>०-५-१<br>०-१-८<br>०-२-८ | | उलवे नोड येथील भूखंड क्र. १०A, सेक्टर-२२, क्षेत्र-२९९.७० चौ.मी. | मूळ भूधारक कै. अनुबाई लक्ष्मण कोळी (मयत), कै. महादेव लक्ष्मण कोळी (मयत) यांचे वारस १) श्री. हडकू उर्फ हरिश्चंद्र लक्ष्मण कोळी, २) श्रीमती नर्मदा कुंडलिक कोळी, ३) श्रीमती मंजुळा महादेव नाईक, ४) श्री. राजेश महादेव नाईक, ५) श्री. नरेश महादेव नाईक, ६) कु. कांचन महादेव कोळी, ७) श्रीमती गीता एकनाथ कोळी व ८) श्रीमती ज्योती संतोष पाटील | -- |
| | | गव्हाण ६४५ | २४५/१ | ०-०५-८ | | | | |
| | | गव्हाण ६४५ | १८/७ | ०-०९-७ | | | | |
| २ | उलवे १९१२ | दापोली १०७-१ | ६/२<br>७९/६<br>१०९A/६<br>११२/१२<br>२९/१<br>९९/२ | ०-२-०<br>०-८-०<br>०-२९-०<br>०-६७-०<br>०-२-५<br>०-१५-० | ११०० | उलवे नोड येथील भूखंड क्र.२A, सेक्टर-१०B, क्षेत्र-१०९९.७२ चौ.मी. | रे.मु.क्र. १२०/२०१४ मधील दिनांक १६.१२.२०२३ रोजीचे आदेश व वारस दाखला क्र. १४९६/२०२४ विचारात घेता १) श्री. कृष्णा उर्फ किसन बाळा कुडावकर, २) श्री. महादेव बाळा कुडावकर, ३) श्रीमती चांगुना भगवान जितेकर, ४) श्रीमती यशोदा हनुमान घोपरकर, ५) श्रीमती सुरेखा दिलीप घरत, ६) श्रीमती अनुसया नारायण कुडावकर, ७) श्री. अशोक नारायण कुडावकर, ८) श्रीमती सपना वासुदेव पाटील, ९) श्रीमती सुनंदा रमेश भगत, १०) श्री. किशोर नारायण कुडावकर, ११) श्री. सुर्यकांत नारायण कुडावकर, १२) श्रीमती राजश्री राजेश ठाकूर, १३) श्रीमती मनाली महेश कोकंबे, १४) श्रीमती सुचिता सतिष पाटील, १५) श्री. रजनिकांत जनार्दन माळी, १६) श्री. कौस्तुभ जनार्दन माळी, १७) श्रीमती मैना बाबू कुडावकर, १८) श्री. गजानन बाबू कुडावकर, १९) श्रीमती चंद्रभागा रघुनाथ जितेकर, २०) श्रीमती भिमाबाई बळीराम पाटील, २१) श्रीमती द्रोपदी विश्वनाथ गायकवाड, २२) श्रीमती नर्मदा रामचंद्र दमडे, २३) श्रीमती गंगाबाई रोहिदास पाटील, २४) श्रीमती ज्योत्सना उर्फ जनाबाई धर्मा पाटील | -- |
| ३ | करंजाडे ७२५ | कोपर -१२३ | १५/६<br>३५/६ | ०-१६-९ | १५० चौ.मी. | **नोड - उलवे भूखंड क्र. ११D, सेक्टर-२२, क्षेत्र १४९.६९ चौ.मी.** | **श्री. रामा नामा पाटील** | निरंक |
| | | | | **०-१६-९** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्धी झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१७२/२०२५-२६

# लैंगिक शोषण प्रतिबंध जनजागृती

## गव्हाण विद्यालयात मार्गदर्शनपर व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सद्यस्थितीमध्ये लैंगिक शिक्षणाची आवश्यकता आणि लैंगिक शोषणास प्रतिबंध करण्यासाठी मुला-मुलींच्या धाडसाची आवश्यकता या विषयी समुपदेशन करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यालयाच्या 'लैंगिक शोषण प्रतिबंधक समिती'मार्फत माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील मुले व मुली अशा दोन स्वतंत्र गटांमध्ये किशोरवयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष व्याख्यान झाले.

विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या समुपदेशन व्याख्यानात उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, गुरुकुल विभाग प्रमुख संदीप भोईर, शितलकुमार म्हात्रे, चारुशीला ठाकूर, अर्चना पाटील, जयराम सोनटक्के, राजेंद्र चौधरी आदींची विशेष उपस्थिती होती.



या वेळी किशोरवयीन मुली आणि मुले असे दोन गट करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर यांनी लैंगिक शिक्षणाची गरज व सध्याच्या स्थितीत मुलींनी धीटपणे धाडसाने आलेल्या प्रसंगाचा सामना कसा केला पाहिजे या संदर्भात थोडक्यात मार्गदर्शन केले. उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी किशोरवयातील आकर्षण आणि प्रेम यातील पवित्र फरक विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट केला.

मुलींच्या गटामध्ये ज्युनिअर कॉलेज शिक्षिका करूणा तांडेल यांनी इंटरॅक्टिव बोर्डवर पी.पी.टी.द्वारे माहितीपूर्ण मार्गदर्शन करताना रोजच्या जीवनातील चांगले वाईट प्रसंग सांगून मुलांच्या मुलींच्या मनातील शारीरिक मानसिक, भावनिक, सामाजिक बदल याच्याविषयी चर्चा करून मुलींना बोलते केले. मासिक पाळी आणि स्वच्छता या बद्दलही शास्त्रीय माहिती सांगितली. कोणत्याही आकर्षणाला, प्रलोभनाला बळी न पडता मानसिक दृष्ट्या सक्षम राहण्यासाठी 'जपून टाक पाऊल इथे प्रत्येक वाट आपली नसते' या कवितेच्या आशयान्वये मुलींना प्रबोधन केले. 'महात्मा फुलेंनी मुलींचे शिक्षण केले खुले ग SS' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

मुलींच्या गटातील कार्यक्रमाचे प्रास्ताविक एच.आर.पाटील यांनी तर केले तर मुलांच्या गटातील कार्यक्रमाचे प्रास्तविक ज्युनिअर कॉलेज शिक्षक माणिक घरत यांनी केले.

### मुलांसाठीही समुपदेशन

किशोरवयीन मुलांमध्ये होणारे बदल त्यांची मानसिकता व भावनीक स्थिती, सध्याच्या मुलांची जीवन जगण्याची, राहणीमानाची पद्धत आणि त्यात करावयाचे बदल या विषयांवर पीपीटीद्वारे गुरुकुल विभाग प्रमुख संदिप भोईर यांनी उहापोह करुन चर्चा केली तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

# चार दिवसांत ६८,१४९ उमेदवारांनी दिली भरती परीक्षा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सरळसेवा भरती २०२५ परीक्षेच्या चौथ्या दिवशी १२ जिल्हयांमधील २८ परीक्षा केंद्रांवर १३१२८ उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा दिली. १६ ते १९ जुलै या परीक्षेच्या चार दिवसांत एकूण ६८१४९ उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सर्व केंद्रांवरली परीक्षा प्रक्रिया व्यवस्थित रितीने पार पडली.



गट-क आणि गट-ड मधील ३० संवर्गातील ६६८ पदांकरिता १२ जिल्ह्यांमध्ये २८ केंद्रांवर टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिस यांच्या माध्यमातून परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. या परीक्षा प्रक्रियेवर निरीक्षण व नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, नवी मुंबई महानगरपालिकेच्या वर्ग १ श्रेणीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'समन्वय अधिकारी 'म्हणून तसेच २९ अधिकाऱ्यांची 'केंद्र निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

पदभरती परीक्षेच्या पहिल्या दिवशी २१५१५ उमेदवारांनी, दुसऱ्या दिवशी १८४४२ उमेदवारांनी, तिसऱ्या दिवशी १५०६४ उमेदवारांनी व चौथ्या दिवशी १३१२८ उमेदवारांनी परीक्षा दिली आहे. अशाप्रकारे चार दिवसात ६८१४९ उमेदवारांनी २८ केंद्रांवर ऑनलाईन परीक्षा दिलेली आहे. चार दिवसांची ही संपूर्ण परीक्षा प्रक्रिया सुव्यवस्थित रितीने पार पडली आहे.

या संपूर्ण परीक्षा प्रक्रियेशी संबंधित सर्व घटकांचे तसेच १२ जिल्ह्यांतील पोलीस विभागाचे आणि उमेदवारांचे नवी मुंबई महानगरपालिकेकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत. नवी मुंबई पालिकेची भरती प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार काटेकोरपणे होत असून नोकरी मिळवून देण्यासाठी कोणत्याही प्रकारची मागणी केली जात असल्यास उमेदवारांनी दक्ष रहावे व स्थानिक पोलिसांकडे तक्रार करावी, असे सूचित करण्यात येत आहे. उमेदवारांनी महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in तसेच महानगरपालिकेच्या अधिकृत सोशल मिडीया पेजला भेट द्यावी, असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

# उरण महाविद्यालयात करिअर संसदेचा शपथविधी

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण कॉलेजमध्ये 'करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसदेचा' शपथविधी सोहळा मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरित्या पार पडला.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मंत्रीमंडळ स्वरूपात जबाबदाऱ्या स्वीकारून लोकशाही मूल्यांची शपथ घेतली.

शपथविधी सोहळ्याचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वाल्मीक गरजे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शपथ दिली. यावेळी त्यांनी या करिअर संसदेचा उपयोग भावी आयुष्यात नेतृत्व विकासासाठी मोलाचा ठरेल असे सांगितले व नवनियुक्त मंत्रिमंडळातील सर्व मंत्री व सदस्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी मार्गदर्शक प्रा. व्ही.एस. इंदुलकर, प्रा.डॉ. एम.जी. लोणे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन प्रा.डॉ. ए.आर. चव्हाण यांनी केले.



विद्यार्थी मंत्रीमंडळ करिअर कट्टा २०२५, मुख्यमंत्री प्राप्ती पांगुल, नियोजन मंत्री आरती पाटील, कायदे व शिस्त पालन मंत्री अथर्व महाकाळ, सामान्य प्रशासन मंत्री सिद्धी पाटील, माहिती व प्रसारण मंत्री उन्मेश महाकाळ, उद्योजकता विकास मंत्री हर्षल मोढवे, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री मयुरी पाटील, कौशल्य विकास मंत्री कनिक्षा पाटील, संसदीय कामकाज मंत्री मृणाल कोळी, महिला व बालकल्याण मंत्री हेमांकी फळसंकर, सदस्य शार्दुल गायकवाड, सदस्य प्रथमेश अधिकारी या विद्यार्थ्यांनी पदाची व गोपनीयतेची शपथ घेतली तसेच महाविद्यालयाची शिस्त व विकास यासाठी कटिबद्ध राहुल कार्य करीन असे मान्य केले.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा ५६ व्या स्मृतिदिनी ग्रामपंचायत तुराडे सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड, उपसरपंच मालती संतोष वाघमारे, मा.उप सरपंचं रिया माळी, सदस्य स्नेहा गायकर,ग्रामपंचायत अधिकारी अस्मिता मोकल,माजी उपसरपंच विश्वनाथ गायकवाड व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.



कष्टकरीनगर येथे हि अण्णाभाऊ साठे यांना पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून उपस्थितांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या वेळी रासायनी परिसरातील अनेक बांधव उपस्थित होते. या वेळी माजि उपसरपंच विश्वनाथ गायकवाड यांनी उपस्थिताना अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती अण्णाभाऊंचे संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा,मुंबई महाराष्ट्रातच राहावी, कामगारंचे प्रश्न, आणी दीड दिवस शाळेत जाऊन भलं मोठं साहित्य, पोवाडे, चित्रपट कथा लिहून महाराष्ट्रासाठी मोठं योगदान आसल्याचे सांगितले. तसेच मातंग समाज रासायनी परिसरात मोठया संख्येने उपस्थित असूनहि समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत या वेळी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

या वेळी लोकशाही मानवाहित पक्शाचे रायगड जिल्हा अध्यक्ष कृष्णा झोंबाडे, काशिनाथ खुडे, विनोद कांबळे, प्रथमेश गायकवाड, दादु काळोखे, लंकेश खवले, जेष्ठ कार्यकर्ते सुरेश वायदंडे, मयूर गायकवाड, तुषार गायकवाड, आतिश भिंगारदिवे, वैभव गायकवाड, दत्ता कांबळे आदी उपस्थित होते.

# विद्याभवनमध्ये राष्ट्रीय विज्ञान कथा दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात मराठी विज्ञान परिषदेचे नवी मुंबई विभाग अध्यक्ष डॉ. किशोर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय विज्ञान कथा दिन साजरा करण्यात आला.

१९ जुलै हा दिवस ज्येष्ठ भारतीय शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचा जन्मदिवस असल्यामुळे हा दिवस राष्ट्रीय विज्ञान कथा दिवस म्हणून साजरा केला जातो.

डॉ. किशोर कुलकर्णी यांनी वाचन आणि विज्ञान विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संभव-असंभव या विज्ञानकथेचे त्यांनी सादरीकरण केले. सखोल शास्त्रशुद्ध विचार आणि तत्व डोळ्यासमोर ठेवून विज्ञान कथा गुंफल्या जातात. या कथा वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवतात.



या वेळी डॉ. कुलकर्णी यांनी आयझ्याक असीमव तसेच अनेक भारतीय आणि परदेशी विज्ञानकथा लेखकांचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील विज्ञानकथा वाचून नियमित नवीन उपक्रम सुचवले आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. या वेळी समन्वयक पांडुरंग मुळीक, विज्ञान शिक्षक दत्तात्रय आटपाडकर, आदर्श शिक्षक अविनाश कुलकर्णी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, २३ जुलै रोजी रक्तदान शिबीर आणि शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप केले जाणार आहे.



भाजयुमाचे माजी नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडूरंग आमले आणि साईभक्त महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा शारदा पांडूरंग आमले यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सानपाडा सेक्टर ८ मधील केमिस्ट भवनमध्ये सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत रक्तदान शिबीराचे तर सानपाडा सेक्टर ४ मधील विवेकानंद संकुल स्कूलमध्ये सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत शालेय विद्यार्थ्यांना वह्याचे मोफत वाटप केले जाणार आहे. रक्तदान शिबिरात सानपाडावासियांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सानपाडा भाजप विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रावण मासात दर गुरुवारी साई मंदिरात पूजा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी मोहोपाडा येथील श्री साईबाबा मंदिरात श्रावण मासानिमित्त ३१ जुलै २०२५ पासून दर गुरुवारी श्री साई दरबारात सामुदायिक श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन श्री साई मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.



श्रावणात दर गुरुवारी पुजेसाठी बसणाऱ्यांना पुजेचे साहित्य मंदिराकडून पुरविण्यात येणार असून एकूण पुजामुल्य ७५० रुपये असणार आहे. अधिक माहितीसाठी श्री साईबाबा सत्संग केंद्र रसायनी ९९६०९४०२४४/९८५०७५७१२१ मंदिरातील पुजारी अथवा मंदिराचे अध्यक्ष व विश्वस्त यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मोहोपाडा येथील श्री साई मंदिर हे मिनी शिर्डी म्हणून ओळखले जात असल्याने वर्षभर येथे दर्शनासाठी श्री साई भक्तांची रेलचेल असते. वर्षांनुवर्षे दर गुरुवारी येथे मोफत अन्नदान भंडारा पुरविला जातो.

# उरणच्या मधुबन कट्ट्यावर फुलल्या रानभाज्यांच्या कविता

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण वतीने दर महिन्याच्या १७ तारखेला मधुबन कट्टा विमला तलाव येथे कवी संमेलन संपन्न होत असते. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक हिराचंद म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मधुबन कट्ट्याच्या ११७ व्या कवी संमेलनात कवि मच्छिंद्र म्हात्रे, अजय शिवकर, हेमंत पाटील, बालकवी अनुज शिवकर, अनामिका राम, समता ठाकूर, तेजस्विनी गायकवाड, र प्रा. एल. बी पाटील, रामचंद्र म्हात्रे आदी कवींनी रानभाज्यांवर कविता सादर करून काव्य संमेलनाला एक वेगळीच रंगत आली.

कवी संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात १७ जुलैचे अवचित्य साधून मधुबन कट्ट्यावर कादंबरीकार श्री गज आनन म्हात्रे यांनी ७७ वर्षांपूर्वी चक्रीवादळाच्या तडाख्याने बुडालेल्या रामदास बोटीच्या आठवणी जाग्या केल्या. या वेळी जेष्ठ पत्रकार जगदीश तांडेल यांनी भविष्यात रानभाज्यांचे संवर्धन करण्यासाठी उरण तालुक्यातील डोंगर, माळराने वाचवायला हवी, यासाठी खूप मोठ्या प्रमाणात जनजागृतीची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मच्छिंद्र म्हात्रे यांनी महाराष्ट्रातील रानभाज्यांचा आढावा व महत्त्व विषद केले.

त्याचप्रमाणे कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंढरपूर येथील साहित्यिक वारीचे अनुभव विषद केले. या कवी संमेलनास ज्येष्ठ नागरिक सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम, संजीव पाटील, मारुती तांबे, अनिता शिवकर, मीना बिष्ट रमेश माळी, रवींद्र सूर्यवंशी, महिंद्र सोनवणे, देविदास पाटील, सुनील पाटील, अरविंद घरत, सुरेश ठाकूर, एस.ए. चव्हाण, भीमा अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. शेवटीआगरी पसायदान सादर करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# कै. सार्थक खराडे याच्या पुण्यस्मरणार्थ विविध कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी मोहोपाडा येथील पत्रकार राकेश खराडे व ग्रामपंचायत सदस्या रसिका खराडे यांचा चिरंजीव कै.सार्थक राकेश खराडे याच्या सहाव्या पुण्यस्मरणार्थं महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग, भूमी अभिलेख, तहसीलदार खालापूर, चौक ग्रामीण आरोग्यकेंद्र व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खालापूर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२४) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांना आपल्या मालमत्तेचे शासकिय दस्तऐवज काढताना अनेक चक्रा मारुनही काम होत नसल्याने ग्रामस्थ नागरिकांत नाराजी दिसून येत होती. शिवाय भविष्यात वासांबे मोहोपाडा नगरपरिषद होण्याची चिन्हे असल्याने आपल्या मालमत्ता असल्याचे शासन सनद, मालमत्ता पत्रक (प्रापर्टी कार्ड) काढण्यासाठी अनेकवेळा भूमी अभिलेख विभागात नागरिक जावूनही काम होत नव्हते. हि समस्या पत्रकार राकेश खराडे यांनी जाणली व शासनाकडे मागणी केली. त्यानुसार शासन महसूल भुमी अभिलेख विभागाकडून वासांबे मोहोपाडा हद्दीतील ग्रामस्थांना जागेच्या शासन सनद वाटप, सिटी सर्व्हे नंबर शोधणे व मालमत्तापत्रक(प्रापर्टी कार्ड) काढून देणे तसेच नागरिकांना हॉस्पिटलात मोफत उपचार करता यावेत, यासाठी आरोग्य विम्यासाठी आयुष्यमान भारत कार्ड काढून देणे तसेच शालेय विद्यार्थ्यांची व जेष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी, एचआयव्ही तपासणी,डोळे तपासणी या कार्यक्रमांचे आयोजन मोहोपाडा येथील श्री दत्त मंदिराच्या सभामंडपात गुरुवार दि.२४ रोजी सकाळी १० ते २ या वेळात करण्यात आले आहे.



जनता विद्यालय मोहोपाडा शाळेतील राष्ट्रीय सेवा योजनेतील (NSS)च्या ३५ विद्यार्थी व शिक्षकांना मोफत कै.सार्थंक खराडे प्रिंटेड टि शर्ट वाटप करणे,जनता विद्यालयातील मराठी माध्यमाच्या पहिली ते चौथीच्या १५० विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्याचा कार्यक्रम जनता विद्यालय शाळेच्या सभामंडपात दुपारी १२ वाजता होईंल. तसेच वासांबे मोहोपाडा हद्दीतील पाच ते दहा वयातील गरजू व गोरगरीब मुलांना मोफत कपड्यांचे वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खालापूर तालुका शासकिय अधिकारी आणि खालापूर तालुक्यातील पत्रकार बांधव परिश्रम घेत आहेत.

कै.सार्थंक राकेश खराडे याच्या पुण्यस्मरणानिमित्त दरवर्षी परिसरात विविध सामाजिक,सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम आयोजिले जातात.

# 'विहिंप'तर्फे हिंदू वैदिक पद्धतीने जन्मदिवस साजरे

**नवी मुंबई : बातमीदार**

विश्व हिंदू परिषद (मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क आयाम) यानी संगठित हिंदू सशक्त भारत हा उद्देश्य ठेवून सामूहिक वाढदिवस सोहळा श्री शिवसाई मंदिर सेक्टर २ सीबीडी बेलापूर येथे सनातनी हिंदू वैदिक पद्धतीने होम हवन करून आयोजित करण्यात आला होता. समाजातिल विविध वर्गातील धर्मबंधु,भगिनी आणि ज्येष्ठ नागरिकानीं या उपक्रमात सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश संपूर्ण हिंदू समाजाला धर्माबद्दल माहिती देणे. मनात देवाबद्दल आदर, सन्मान, देशभक्ती आणि भक्तीची भावना निर्माण करणे आहे. जन्मदिवसाची भेट म्हणून प्रभु श्री रामांची प्रतिमा, धर्मध्वज, आणि धार्मिक ग्रंथ भेट देन्यात आले. दर महीन्याच्या शेवटच्या रविवारी सामुहिक वाढ़दिवस नवी मुंबई जिल्ह्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला. गेला,अर्चक एवं पुरोहित आयामाचे प्रांत प्रमुख राजकुमार भारद्वाज यांनी उपस्थितांना सामुहिक वाढदिवस साजरे करण्या मागच्या उद्देशाबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमासाठी मंदिराचे ट्रस्टी डॉ. जयाजी नाथ यांचे विशेष सहकार्य लाभले. बेलापुर प्रखंड मंदिर एवं अर्चक पुरोहित आयामचे प्रमुख अनिल माहटे यांच्या मार्फ़त कार्यक्रमाची पूर्ण रचना केली. कोकण प्रांत समरसता प्रमुख प्रो. मारूती मतलापुरकर, जिल्हा मंत्री स्वरूप पाटील मातृशक्ति विभाग संयोजिका माया परमार, मातृशक्ति जिल्हा संयोजिका नयना शेट्टी उपस्थित होते.



# महानगरची लाईन फुटून गॅस गळती





## पेणमध्ये घटना; सुदैवाने कोणतीही हानी नाही!

**पेण : प्रतिनिधी**

पेण आगरी समाज भवनकडे जाणार्‍या व नव्याने बांधकाम करीत असलेल्या रिंगरोडलगत नगर परिषदेच्या गटाराचे बांधकाम सुरु असताना माती काढतेवेळी जेसीबीच्या पंजाचे टोकरदार टोक लागून तेथे टाकलेली भूमीगत गॅस पाईपलाईन फुटली. यावेळी त्या पाईपमधील गॅस बाहेर येऊन हवेतील ऑक्सिजनच्या झालेल्या संपर्कामुळे त्याने पेट घेतला आणि आगीचे लोळ बाहेर पडू लागले. पालिका अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी ड्राय पावडरचा फवारा मारुन आग आटोक्यात आणली. या बाजूचा वाहतूकीचा रस्ता बंद असल्यामुळे सुदैवाने कोणत्याही प्रकारचा अनर्थ घडला नाही.

सध्या पेण शहरामध्ये अनेक ठिकाणी महानगर एलपीजी गॅस पाईपलाईनचे काम प्रगतिपथावर आहे. शहराच्या प्रत्येक गल्लीबोळात रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. गॅस गळती झाल्याचे निदर्शनास येतात महानगर गॅसच्या सेफ्टी सुरक्षा प्रबंध यंत्रणेने येऊन तातडीने होणारा गॅसपुरवठा बंद केला. सुमारे अर्ध्या तासात सर्व सोपस्कार पूर्ण झाले.

या वेळी तातडीने दखल घेत मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी जातीने लक्ष केंद्रित करीत संबंधित सर्व यंत्रणा तसेच नगर परिषद कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली अणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. या घटनेबाबत मंगळवारी महानगर गॅस वितरण करणार्‍या अधिकारीवर्गाची तातडीची बैठक मुख्याधिकारी यांनी बोलावली असून सुरक्षा प्रबंधाबाबत ते या बैठकीत माहिती देणार आहेत.

# सुपारी उत्पादक शेतकर्‍यांना दिलासा



**माणगाव : प्रतिनिधी**

मागील काही वर्षात निसर्ग वादळाने इतर पिकांबरोबर सुपारीचे मोठे नुकसान झाले आहे. कोकणातील शेतकर्‍यांची सुपारी लागवड करण्याकरिता मागणी असून ज्या शेतकर्‍यांना रोजगार हमी योजनेंतर्गत सुपारी लागवडीचा लाभ घेता येत नाही अशा शेतकर्‍यांसाठी सुपारी फळ पिकाचा भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये समावेश करण्याबाबतच्या सूचना फलोत्पादनमंत्री भरत गोगावले यांनी उपस्थित संबंधित अधिकार्‍यांना दिल्या. त्यामुळे सुपारी उत्पादक शेतकर्‍यांना दिलासा मिळाला आहे.

मंत्री भर गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन मुंबई येथे त्यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीला कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी, फलोत्पादन उपसचिव श्रीकांत दांडगे, संचालक अंकुश माने, खासगी सचिव ज्ञानोबा बानापुरे, विशेष कार्य अधिकारी दत्तात्रय भिसे यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी, स्वीय सहाय्यक मनोज जाधव इत्यादी उपस्थित होते. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ राज्यात सुरू झाली असून आजपर्यंत या योजनेत १६ फळपिकांचा समावेश होता. त्यामध्ये सुपारीचा समावेश नसल्याचे बैठकीत मंत्रीमहोदय यांनी निदर्शनास आणून दिले. त्यांनी सुपारीचाही समावेश करण्याचे आदेश दिले.

जगप्रसिद्ध असणारी श्रीवर्धन रोटा ही सुपारी रायगडसह कोकण किनारपट्टीलगत शेतकरी मोठ्या प्रमाणात लागवड करत असतात. श्रीवर्धन रोटासह अन्य सुपारी जातीची लागवड सलग व नारळात आंतरपीक म्हणून घेतले जाते. सुपारीला धार्मिक आणि सांस्कृतिक कार्याबरोबर व्यापारी, आर्थिक आणि औषधी महत्त्व आहे. सुपारीची लागवड सिंधुदुर्गातील वैभववाडी, सावंतवाडी, वेंगुर्ला, कुडाळ, देवगड, मालवण आणि रत्नागिरी येथील राजापूर ,रत्नागिरी गुहागर, दापोली, मंडणगड; त्याचप्रमाणे रायगडातील श्रीवर्धन, म्हसळा, मुरूड, अलिबाग येथे मोठ्या प्रमाणात केली जाते आहे. आता सुपारीचा योजनेत समावेश झाल्याने शेतकर्‍यांना दिलासा मिळाला आहे.

# रामवाडीत स्वच्छता, श्रमदान, प्लास्टिकबंदी जनजागृती

### जन शिक्षण संस्थान रायगडचा उपक्रम



**पेण : रामप्रहर वृत्त**

जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून पेण रामवाडी हा केंद्राजवळचा परिसर स्वच्छ करण्यात आला आणि प्लास्टिकचे प्रदूषण, प्लास्टिकचा दुरुपयोग या विषयावर मार्गदर्शन केले गेले.

संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमय्या, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे व व्यवस्थापन मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जेएसएसच्या माध्यमातून १६ ते ३१ जुलै या १५ दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येणार आहेत

प्लास्टिकबंदीच्या आग्रहातून प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण करण्यासाठी स्वच्छता अभियान गरजेचे आहे, असे मत डॉ. कोकणे यांनी व्यक्त केले.

याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून रामवाडी या ठिकाणी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. कल्पना म्हात्रे, साधनव्यक्ती मयुरी पाटील, मोहिनी भोईर व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाला उपस्थित असणार्‍या प्रशिक्षणार्थींना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली.

# रोटरी क्लबकडून शेलू, कळंब येथील शाळांना सोलर पॅनल



**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई येथील देवनार रोटरी क्लब आणि कर्जत ग्रामीण रोटरी मंडळ यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा यांना विजेचा आर्थिक भार कमी करण्यासाठी सोलर पॅनल बसवून देण्याचा प्रयत्न सुरु आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शेलू आणि कळंब येथील शाळेच्या छपरावर सोलर पॅनल बसविण्यात आल्यानंतर या दोन्ही शाळा विजेच्या दृष्टीने स्वयंपूर्ण झाल्या आहेत.

रोटरी क्लब ऑफ देववार यांच्या सौजन्याने कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागात सामाजिक व शैक्षणिक कार्य केले जाते. शाळा विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्या पाहिजेत यासाठी देवनार रोटरी कडून शाळेनं सोलर पॅनल देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्या माध्यमातून जुम्मापट्टी येथील जिल्हा परिषद शाळत हा उपक्रम यशस्वी झाला आहे. रोटरी क्लब कडून कर्जत तालुक्यातील शेलू आणि कळंब या जिल्हा परिषद शाळेत सोलर पॅनल बसविण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

या सोलर पॅनेलचे उदघाटन रोटरीचे डिस्ट्रीक्ट में ३१४१ चे गव्हर्नर डॉ मनिष मोटवानी रोटरी क्लब ऑफ देववारच्या अध्यक्षा अलका मुरली यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी डिस्ट्रिक गव्हर्नर डॉ. मनिष मोटवानी, असिस्टेट गव्हर्नर सतीश शाह, सेक्रेटरी सी के. मोहन,चेअरमन. कन्नन, कुलभुषण जेटली जेटली, सुरेदनाथ आदी प्रमुख तसेच कर्जत तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अनंता खैरे आदी उपस्थित होते.

महिला बचतगट प्रमुख रेखा हिरेमठ, बागडे गुरुजी, डॉ. रूपेश सोनावळे, संतोष बदे, हनुमान बदे, सिताराम बदे, प्रकाश सोनावळे, दत्तात्रय पाटील, देशमुख,भरत खेडकर, अरुण मसने, दिनेश धुळे,अनंता मसने,अक्षय हिसालके, बाळाराम तरे आदी उपस्थित होते.

# म्हसळ्यात भातशेती लावणी ९७% पूर्ण



**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यात भातशेतीची ९७ टक्के लावणी पूर्ण झाली आहे. तालुक्यात पिकाखालील क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. सन २०२२ साली २२६० हेक्टर, २०२३ साली १९०५, २०२४ साली १३६६.७० आणि आता २०२५ साली १२९८ हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड करण्यात आली आहे.

तालुक्यात खरीप हंगामात भातपिकाच्या बरोबरीने नागली, वरी, तूर आणि भाजीपाला ही पिकेसुद्धा घेतली जातात. चालू वर्षी भात १२३८.८३ हेक्टर, नागली ७२.५० हेक्टर, वरी १० हेक्टर, तूर (बांधावर पीक) ७.५ हेक्टर, हळद १६ हेक्टर आणि भाजीपाला १.९६. हेक्टर क्षेत्रावर लागवड होत असल्याची माहिती कृषी अधिकारी नरेश जामकर यानी दिली.

खरीप हंगामात बहुतांश शेतकरी भाताच्या सुवर्णा, वाडा कोलम, रुपाली, कर्जत ९, रत्नागिरी ८, चिंटू, जया या जातीच्या वाणांची लागवड करतात. वास्तविक पाहता शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आणि शेतकरी हा त्याचा आत्मा आहे. केंद्र आणि राज्य शासनाचा कृषी विभाग फार मोठ्या प्रमाणावर कृषी विषयक संशोधन व योजना करत असताना पिकाखालील क्षेत्र कमी होणे याचा अभ्यास होणे आवश्यक आहे, असे मत काही जाणकार शेतक ऱ्यांचे आहे.

दरम्यान, तालुक्यांतील बहुतांश मजूर गावाकडून शहराकडे स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे शेतीसाठी मजुरांची कमतरता भासत आहे.

# काकळघर उपसरपंचपदी निशांत दांडेकर बिनविरोध

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काकळघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निशांत दांडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपसरपंच सुरेक्षा सुरेश ठाकूर यांनी राजीनामा दिल्याने झालेल्या उपसरपंचपदाच्या रिक्त पदाची निवडणूक घेण्यात आली.

सरपंच स्वस्तिक ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडणुकीत उपसरपंचपदासाठी निशांत दांडेकर यांचा एकमेव अर्ज आल्याने ते बिनविरोधी निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडणुकीसाठी ग्रामपंचायत अधिकारी संगिता पेडवी यांचे मार्गदर्शन लाभले.

निवडणुकीवेळी शिवसेनेचे सी.एम. ठाकूर, उपविभाग प्रमुख सुरेश ठाकूर, सतेज ठाकूर, उमेश भिसे, वैभव वादळ, महेश जाधव, माजी उपसरपंच सुरेक्षा ठाकूर, सुदेश पाडावे, मंगेश कुळवे, काळीताई ठाकूर, मंगेश जोगत, विशाल दिवेकर, प्रणय शिर्के आदी उपस्थित होते.



# आदिवासी मुलीला मिळाले जीवदान

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथे एका आदिवासी मुलीला शॉक बसला होता. दोन व्यक्तींच्या जागरूकतेमुळे या मुलीला जीवदान मिळाले आहे.

मुरूड येथील श्री दत्त मंदिराजवळील परिसरातील मागच्या बाजूस शिव शंकराच्या पिंडीजवळील परिसरात दोन आदिवासी भावंडे खेळता खेळता विद्युत पुरवठा डिपीजवळ आली. या वेळी मुलगी सलोनी हिने डिपी उघडून हात घातल्याने तिला जोरदार शॉक लागल्याने तिचा भाऊ प्रतीक याने आरडाओरड केल्याने त्या ठिकाणी असणारे भक्तगण ऋषी विजय पोतदार व मंदिराची देखभाल करणारे दीपक शिर्के यांनी महावितरणचे कर्मचारी आकाश विरुकुड यांना फोन करून ताबडतोब विद्युत पुरवठा बंद केला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आणि सलोनीचा जीव वाचला.

ऋषी पोतदार व दीपक शिर्के यांनी मुलीला उचलुन मंदिरात आणण्यात आले. तद्नंतर काही वेळाने ती शुद्धीत आली. त्यावेळी तिला विचारणा केली असता तिने सांगितले, मला वाटले की त्या डिपीमध्ये खेळणी आहेत. वास्तविक तिने फ्युज काढण्याचा प्रयत्न केला. फ्युज निघाला नाही, पण बाजुच्या तारेला हात लागल्याने मुलीला शॉक बसला होता.

ही बातमी कळताच दत्त मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रमोद भायदे यांनी लगेच घटनास्थळी येऊन मुलीची विचारपूस करून विद्युत पुरवठा डिपीची पाहणी केली.


**जाहीर नोटीस**

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP ८५८/२०२४**

**नितीन रूपाजी आंब्रे** — **अर्जदार**

**विरूद्ध**

**चरानिया कंपनी** — **विरूद्ध पक्षकार**

**आणि**

**रॉयल सुंदरम जनरल इन्शु.कंपनी लिमिटेड** — **विमाकार**

**प्रति,**
**चरानिया कंपनी**
**पत्ता-** सर्वे क्रमांक ३२.२ ए , टेंभेवाडी,खालापूर, पनवेल - ४१० २०३.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **२२-०८-२०२५** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **अध्यक्ष श्रीमती मोनिका इनोक आर्लंड** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस दिनांक **०३-०७-२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
अध्यक्ष
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१


# खालापूर येथे ‘ओळख साहित्यिकांची’

**खोपोली : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना विविध साहित्यिकांची माहिती व्हावी या उद्देशाने सामर्थ्य शब्दांचे या अभियानांतर्गत ओळख साहित्यिकांची या उपक्रमाचा शुभारंभ खालापूरच्या स्वामी विवेकानंद विद्या मंदिरातील सभागृहात करण्यात आला.



या वेळी सामर्थ्य शब्दांचे या अभियानाचे प्रमुख ज्येष्ठ पत्रकार राजीवजी मुळेकर, कोमसाप खोपोली शाखेचे सल्लागार नितीन भावे, शाळेचे मुख्याध्यापक साईनाथ पाटील, प्रतिभा मंडावळे, सतीश राणे, प्रवीणा पवार इत्यादी व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरुवातीला सरस्वती पूजन आणि थोर साहित्यिक कै. र.वा. दिघे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर राजीव मुळेकर यांनी शालेय विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच साहित्याची गोडी निर्माण व्हावी, त्यांचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे या उद्देशाने दर महिन्याला विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या साहित्यिकांची ओळख करून देणार असल्याचे आपल्या प्रास्ताविकात सांगितले. कोमसाप सल्लागार नितीन भावे यांनी या उपक्रमातील पहिले पुष्प गुंफताना थोर साहित्यिक व रायगड जिल्ह्याचे भूषण असलेल्या कै. र.वा.दिघे यांच्या साहित्य प्रवासाचा आढावा घेतला. दिघे यांनी २१ कादंबर्‍या, कथासंग्रह, नाटके इ. साहित्यप्रकार लिहिले. शेतकरी, आदिवासी यांच्या वेदना त्यांनी आपल्या साहित्यातून मांडल्या. दिघे यांनी खोपोलीत उद्योग यावेत यासाठी प्रयत्न केले. शाळा काढण्यासाठी प्रयत्न केले अशी माहिती नितीन भावे यांनी दिली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील साहित्यिक गुण हेरून त्यांच्या प्रतिभेचा विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असेही शेवटी भावे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन सतीश राणे यांनी केले. खालापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सचिन कडू तसेच स्वामी विवेकानंद विद्या मंदिरातील ८, ९ व १० च्या वर्गातील विद्यार्थ्यांसह, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चौथीच्या वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनी या वेळी उपस्थित होते.

# नर्सिंग सेवा प्रशिक्षण स्वच्छता जनजागृती

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

जन शिक्षण संस्थान रायगड या योजनेत कार्य करत असणार्‍या व जिल्ह्यातील कौशल्य विकास प्रशिक्षण देणार्‍या नर्सिंग सहाय्यक प्रशिक्षण लाभार्थींसाठी इफको-टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडतर्फे नर्सिंग सेवा प्रशिक्षण स्वच्छता जनजागृती व कौशल्यवृध्दी क्षमता बांधणी कार्यशाळा बोर्ली पंचतन येथे घेण्यात आली.

जन शिक्षण संस्थान रायगडच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमय्या, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे व व्यवस्थापन मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आणि कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकारच्या विशेष पुढाकारातून प्रथमोपचार पद्धती आणि पूर्वतयारी नर्सिंग प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसाराकरिता महाराष्ट्र राज्यातील सुप्रसिद्ध डॉक्टर्स व आरोग्यसेवा तज्ञ इत्यादींचे मार्गदर्शन सातत्याने लाभत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित नर्सिंग सेवा प्रशिक्षण स्वच्छता जनजागृती व कौशल्यवृध्दी क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेस मुख्य मार्गदर्शक अतिथी म्हणून डॉ. आकांक्षा तांबे, अ‍ॅड. विनयकुमार सोनवणे, रूपेश गमरे, सेवानिवृत्त गट शिक्षण अधिकारी शीतल तोडणकर, प्रा. कानिफ भोसले, प्रा. कल्पना देवगावकर यांच्या समवेत साधनव्यक्ती विप्राली पुसाळकर, रोहिणी सोनवणे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी भाग्यश्री पुसाळकर यांच्यासह जिल्ह्यातील आरोग्य सेवा प्रशिक्षणात कार्यरत स्वयंसेवक व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



# भारतीय संघात बदलांची शक्यता

## इंग्लंडविरुद्ध चौथ्या कसोटीसाठी खेळाडू निवडीचे आव्हान

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-२ अशा फरकाने पिछाडीवर असलेल्या भारतीय संघाला खेळाडूंच्या दुखापतींनी ग्रासले आहे. २३ जुलैपासून मँचेस्टर येथे सुरू होणाऱ्या महत्त्वपूर्ण कसोटी सामन्यापूर्वी संघ व्यवस्थापनासमोर अंतिम ११ खेळाडू निवडण्याचे मोठे आव्हान आहे. या सामन्यात भारतीय संघ किमान तीन बदलांसह मैदानात उतरण्याची दाट शक्यता असून करुण नायर, आकाश, दीप आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या जागी अनुक्रमे साई सुदर्शन, ध्रुव जुरेल आणि प्रसिद्ध कृष्णा यांना संधी दिली जाऊ शकते.



मँचेस्टर कसोटीपूर्वी वेगवान गोलंदाज आकाश दीप आणि अर्शदीप सिंग हे दुखापतग्रस्त झाले आहेत. अर्शदीपच्या डाव्या हाताला टाके पडले असल्याने त्याचे या सामन्यात खेळणे अनिश्चित आहे, तर आकाश हा मांडीच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे त्रस्त असून तोदेखील संघाबाहेर जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अंशुल कंबोज याला भारतीय संघात सहभागी करण्यात आले आहे.

यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत याच्या बोटाला दुखापत झाली असली तरी तो सामना खेळणार हे निश्चित मानले जात आहे, मात्र तो यष्टीरक्षणाची जबाबदारी सांभाळू शकेल की नाही याबाबत साशंकता आहे.

भारतीय संघातील पहिला बदल आघाडीच्या फळीत होण्याची शक्यता आहे. मधल्या फळीतील फलंदाज करुण नायर मागील सहा डावांमध्ये विशेष कामगिरी करू शकलेला नाही. त्याच्या जागी युवा फलंदाज साई सुदर्शनला संधी मिळू शकते. साईने पहिल्या कसोटीत पदार्पण केले होते, परंतु संघात अष्टपैलू खेळाडूंना प्राधान्य देण्याच्या रणनितीमुळे त्याला संघाबाहेर बसावे लागले होते. नायरला वगळल्यास तिसऱ्या क्रमांकावर खेळण्यासाठी साई सुदर्शन प्रबळ दावेदार आहे.

जर ऋषभ पंत केवळ फलंदाज म्हणून खेळला, तर यष्टीरक्षक म्हणून ध्रुव जुरेलला संघात स्थान मिळू शकते. भारताचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोएशेट यांनी यापूर्वीच पंतला केवळ फलंदाज म्हणून खेळवण्याचे संकेत दिले आहेत. अशा परिस्थितीत अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरला संघाबाहेर बसावे लागू शकते. मँचेस्टरमधील हवामान पाहता, वेगवान गोलंदाजीला अनुकूल परिस्थितीमुळे नितीश कुमार रेड्डी यालाही संधी मिळण्याची शक्यता आहे. याच कारणामुळे फिरकीपटू कुलदीप यादवला आणखी एका सामन्यासाठी संघाबाहेर राहावे लागण्याची शक्यता आहे.

वेगवान गोलंदाज आकाशदीप दुखापतीमुळे खेळू न शकल्यास त्याच्या जागी प्रसिद्ध कृष्णाला संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. तो मालिकेतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये खेळला होता. अर्शदीप सिंग टाके पडल्यामुळे खेळणार नाही. अंशुल कंबोज हा एक पर्याय असला तरी, संघात सहभागी होताच त्याला थेट अंतिम ११मध्ये स्थान मिळण्याची शक्यता कमी आहे. मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराह यांचे संघातील स्थान निश्चित आहे. याव्यतिरिक्त शार्दुल ठाकूर हादेखील एक पर्याय असून तो गोलंदाजीसोबतच फलंदाजीमध्येही योगदान देऊ शकतो.

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा उत्साहात



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार यांच्या जयंतीनिमित्त खोपोली येथील महाराजा हॉलमध्ये जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील १५ तालुक्यातून २००हून अधिक कुस्तीगीरांनी सहभाग घेत क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन घडवले.

राजाराम कुंभार संचलित कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास या नोंदणीकृत संस्थेच्या वतीने घेण्यात आलेली ही कुस्ती स्पर्धा १४ आणि १७ वर्षाखालील मुले व मुली तसेच वरिष्ठ गट पुरुष व महिला अशा सहा गटांमध्ये खेळवण्यात आली.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष डॉ. सुनील पाटील, खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सचिन हिरे, खालापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सचिन पवार, युवा उद्योजक विक्रम साबळे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, ॲड. जयेश तावडे, गजानन हातमोडे, पुणे पिरंगुट येथून आलेले बाळासाहेब गोळे, चांगदेव पवळे, रमेश पवळे, मोहन निकटे, संतोष दगडे, प्रकाश पवळे, महादेव अण्णा गोळे, हनुमंत कुंभार, शिल्पा मोदी, भावेश रावल, तानाजी चव्हाण, दत्तात्रय पालांडे, हेल्प फाउंडेशनचे गुरूनाथ साठेलकर, जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरे, जेसीएमएम स्कूल खोपोलीच्या मुख्याध्यापिका मधुगंधा तुरे आदी उपस्थित होते.

मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना संकुलातील कुस्तीगीरांनी गेल्या चार वर्षांमध्ये ५०हून अधिक विभागीय, राज्य, राष्ट्रीय पदके व महाराष्ट्र केसरी पदक; त्याचसोबत फॉरेन एक्स्पोजर टूर प्राप्त केल्याबद्दल कौतुक केले. क्रीडा शिक्षक पदावर नियुक्त झालेल्या आणि महाराष्ट्र पोलीस दलात भरती झालेल्यांचे अभिनंदन करण्यात आले. संकुलाचे संस्थापक अध्यक्ष राजाराम कुंभार, सचिव जगदीश मरागजे यांचे विशेष कौतुक करत भविष्यात संकुलासाठी कोणतीही मदत करणार असल्याचे अभिवचन देत सर्वांना शुभेच्छा दिल्या. सर्व विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिक, पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे कुस्ती स्पर्धेत सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने खोपोलीत आयोजित जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्ण व रौप्यपदके जिंकली. कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास व खालापूर कुस्ती संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार यांच्या जयंतीनिमित्त ही स्पर्धा आयोजिण्यात आली होती.



महाविद्यालयातील कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातील द्वितीय विभागातील सानिया शेख व मॅनेजमेंट विभागातील प्रथम वर्षाच्या हन्साली पाटील यांनी सुवर्णपदक पटकाविले, तर मॅनेजमेंट स्टडीज विभागातील द्वितीय वर्षाचा सिद्धेश खडकर याने व अकाउंट फायनान्स विभागातील द्वितीय वर्षाचा शिवसुंदर साहू यांनी रौप्यपदक प्राप्त केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेचे कार्यकारी संचालक आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील फिजिकल डायरेक्टर अजिंक्य व रवींद्र शेळके, जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर आदींसह सर्व प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी मार्गदर्शन लाभले.

### महिला युरो २०२५ फुटबॉल स्पर्धा

# विश्वविजेत्या स्पेनची उपांत्य फेरीत धडक

**बर्न : वृत्तसंस्था**

विश्वविजेत्या स्पेनने यजमान स्वित्झर्लंडचा २-०ने पराभव करत महिला युरो २०२५ फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला. या पराभवासह घरच्या मैदानावर हजारो चाहत्यांच्या साक्षीने खेळणाऱ्या स्वित्झर्लंडचा स्पर्धेतील स्वप्नवत प्रवास उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आला. दोन पेनल्टी किक हुकवूनही स्पेनने सामन्यावर आपले वर्चस्व सिद्ध केले, हे या लढतीचे ठळक वैशिष्ट्य ठरले.



वांकडॉर्फ स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात सुरुवातीपासूनच स्पेनने आक्रमक खेळ केला, मात्र स्वित्झर्लंडच्या मजबूत बचावामुळे त्यांना गोलसाठी उत्तरार्धापर्यंत वाट पहावी लागली. सामन्याच्या उत्तरार्धात पाच मिनिटांच्या अंतराने केलेल्या दोन गोलनी स्पेनचा विजय निश्चित केला.

बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या अथिनिया डेल कॅस्टिलोने ६६व्या मिनिटाला गोल करत स्पेनला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर अवघ्या पाच मिनिटांनी, ७१व्या मिनिटाला क्लॉडिया पिनाने डी-बॉक्सच्या बाहेरून एक अप्रतिम गोल करत स्पेनची आघाडी २-० अशी वाढवली. विशेष म्हणजे, स्पेनने या सामन्यात दोन पेनल्टी किक गमावल्या. सामन्याच्या नवव्या मिनिटाला मॅरिओना कॅल्डेन्टे तर ८८व्या मिनिटाला लेक्सिया पुटेलास पेनल्टीवर गोल करण्यात अपयशी ठरल्या. याशिवाय स्पेनचे तीन प्रयत्न गोलपोस्टला लागून वाया गेले. स्वित्झर्लंडच्या खेळाडूंनी शेवटपर्यंत कडवी झुंज दिली, पण विश्वविजेत्या संघापुढे त्यांची कामगिरी तोकडी पडली.

# डब्ल्यूसीएलमधील भारत-पाक सामना रद्द

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स (डब्ल्यूसीएल)मध्ये होणारा भारत-पाकिस्तान सामना आता रद्द करण्यात आला आहे. या सामन्यावरून बराच वाद निर्माण झाला. भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात येणाऱ्या या सामन्यामुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर आता आयोजकांनी यावर स्पष्टीकरण देत भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्याची घोषणा केली आहे.

या सामन्यातून शिखर धवन, हरभजन सिंग, सुरेश रैना, इरफान पठाण, युसूफ पठाण यासारख्या खेळाडूंनी पाकिस्तानविरोधात सामना न खेळण्याचा निर्णय घेतला. शिखर धवन याने ११ मे रोजी आयोजकांना ई-मेलद्वारे सामना खेळणार नसल्याचे सांगितले. भारतीय खेळाडूंनी देशहिताला प्राधान्य देत सामन्यातून माघार घेत आयोजकांना सामना रद्द करण्यास भाग पाडले आहे. आयोजकांनी याबाबत पत्रक काढून जाहीर माफीही मागितली आहे.

# पोयनाड येथे जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेला शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशन आणि झुंझार युवक मंडळ पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. नथुरामभाऊ पाटील यांच्या जयंतीनिमित्ताने कॅरम दिन म्हणून जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेला पोयनाड येथील जय मंगल हॉल येथे शुभारंभ करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा भाजप नेते ॲड. आस्वाद पाटील यांच्या हस्ते व रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीष तुळपुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. जिल्ह्यातील १६८ कॅरम खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला आहे. पुरुष एकेरी कॅरम स्पर्धेसाठी जिल्ह्यातील सर्व विभागाच्या खेळाडूंनी सहभाग घेतला असल्याने स्पर्धेला रंगत येणार आहे. स्पर्धेच्या विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना झुंझार युवक मंडळाचे माजी अध्यक्ष पै.अन्वर बुराण यांच्या स्मरणार्थ रोख रुपये ७००० व ५००० व आकर्षक चषक बक्षिस म्हणून देण्यात येणार आहे.

उद्घाटन समारंभास प्रमुख अतिथी म्हणून रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे सचिव दीपक साळवी, कार्याध्यक्ष प्रदीप वाईंगडे, खजिनदार वैभव पेठे, सदस्य पांडुरंग पाटील, झुंझार युवक मंडळाचे सचिव किशोर तावडे, क्रीडाप्रमुख नंदकिशोर चवरकर, अजय टेमकर, ॲड. पंकज पंडित उपस्थित होते.



# मंत्री आशिष शेलार यांचा सत्कार सोहळा















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com